RNI No. - MAHMAR 2023/84526

विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

☐ वर्ष - १ ☐ अंक -२६० ☐ अमरावती (महाराष्ट्र) ☐ मंगळवार दि.१९ डिसेंबर २०२३ ☐ संपादक - शुभांगी जोशी ☐ मुल्य - १ रु. ☐ पृष्ठ -६

ज्ञानवापी प्रकरणात मुस्लीम पक्षकारांना मोठा धक्का अलाहाबाद हायकोर्टानं सर्व याचिका फेटाळल्या

दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अलाहाबाद

ज्ञानवापी मशिदीसंदर्भातील प्रकरणात अलाहाबाद हायकोर्टानं आज मुस्लीम पक्षकारांना मोठा धक्का देत सर्व याचिका फेटाळल्या. वाराणसी कोर्टातल्या दाव्याची सुनावणी ६ महिन्यात पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच मशिदीचं सर्वेक्षण सुरू ठेवण्यासही कोर्टानं अनुमतीही दिली आहे. सर्व्हे रिपोर्ट कोर्टात दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या कारवाईनं धार्मिक स्थळांच्या पूजाअर्चनेत बाधा येत नाही असा निर्वाळा हायकोर्टानं दिला. सुन्नी वक्फ बोर्ड या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार आहे. तसेच, इंतजामिया कमिटीही सर्वोच्च न्यायालयाची दारं ठोठावणार आहे.

ज्ञानवापी प्रकरणात मुस्लिम पक्षाला अलाहाबाद उच्च न्यायालयाकडून मोठा धक्का देण्यात आला आहे. न्यायालयानं त्यांच्या पाच याचिका फेटाळून लावल्या आहेत, ज्यात टायटल सूटला आव्हान देणाऱ्या मुस्लिम बाजूच्या याचिकेचा समावेश आहे. न्यायमूर्ती रोहित रंजन अग्रवाल यांच्या एकल खंडपीठानं हा निर्णय दिला आहे.दरम्यान, मुस्लिम पक्षकारांच्या वतीनं हिंदू पक्षकारांच्या १९९१ च्या खटल्याला आव्हान देणार्या याचिका अलाहाबाद उच्च न्यायालयात दाखल केल्या होत्या, ज्या न्यायालयानं फेटाळल्या आहेत. अंजुमन इंतेजामिया कमिटी आणि यूपी सुन्नी सेंट्रल वक्फ बोर्डानं १९९१ मध्ये वाराणसी कोर्टात दाखल केलेला मूळ खटला कायम ठेवण्याच्या अलाहाबाद उच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं.

या प्रकरणी ८ डिसेंबर रोजी सुनावणी पूर्ण झाल्यानंतर अलाहाबाद उच्च न्यायालयानं निर्णय राखून ठेवला होता. एकूण ५ याचिकांवर सुनावणी सुरू होती, त्यापैकी २ याचिका सिविल वादावर होत्या आणि ३ याचिका -डख सर्वेक्षण आदेशाच्या विरोधात होत्या. दोन याचिकांमध्ये, १९९१ मध्ये वाराणसी जिल्हा न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या मूळ खटला कायम ठेवण्याला आव्हान देण्यात आलं होतं. न्यायालयाच्या जागेच्या सर्वेक्षणाच्या आदेशाला तीन याचिकांमध्ये आव्हान देण्यात आलं होतं.

दुधात भेसळ केल्यास थेट फाशीची शिक्षा; कायद्यासाठी केंद्राकडे पाठपुरावा करणार : उपमुख्यमंत्री अजित पवार

दि. १९विदर्भ प्रजासत्ताक नागपूर

राज्यात दूधदराचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून अनेक ठिकाणी दूध उत्पादक शेतकऱ्यांकडून आंदोलने केली जात आहेत. शेतकऱ्यांच्या या मागणीबाबत राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाष्य केलं आहे. तसंच दुधात भेसळ करणाऱ्यांविरुद्ध कडक कारवाईसाठी कायदा आणण्याबाबत आमचे प्रयत्न सुरू असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. दूध उत्पादकांच्या समस्या सोडवण्यासाठी राज्य शासन त्यांच्या पाठीशी आहे. त्याचप्रमाणे दूध भेसळ रोखण्यासाठी भेसळ करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध फाशीची तरतूद करण्याचा कायदा तत्कालीन राज्य शासनाने करून केंद्र सरकारकडे पाठवला होता. मात्र त्यास अद्याप राष्ट्रपतींची मान्यता मिळालेली नसल्याने याबाबत पाठपुरावा करण्यात येणार आहे, अशी माहिती अजित पवार अजित पवार पुढे म्हणाले की, दूध अथवा दुग्धजन्य पदार्थांचे सेवन प्रामुख्याने लहान मुले करतात. अशा पदार्थांमध्ये भेसळ करणे योग्य नाही. त्यामुळे अशा व्यक्तींविरूद्ध फाशीची तरतूद करण्याचा कायदा तत्कालिन राज्य शासनाने केला होता. त्यास अद्याप राष्ट्रपतींची मान्यता मिळालेली नसल्याने त्याबाबत पाठपुरावा करण्यात येईल.यांनी विधिमंडळात दिली.

अजित पवार पुढे म्हणाले की, दूध अथवा दुग्धजन्य पदार्थांचे सेवन प्रामुख्याने लहान मुले करतात. अशा पदार्थांमध्ये भेसळ करणे योग्य नाही. त्यामुळे अशा व्यक्तींविरूद्ध फाशीची तरतूद करण्याचा कायदा तत्कालिन राज्य शासनाने केला होता. त्यास अद्याप राष्ट्रपतींची मान्यता मिळालेली नसल्याने त्याबाबत पाठपुरावा करण्यात येईल.

आमदार हरिभाऊ बागडे यांनी दूध उत्पादकांना मदत करण्यासंदर्भातील उपाययोजना करण्याबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती. सदस्य बाळासाहेब थोरात, जयंत पाटील, ड.राहुल कुल, राजेश टोपे आदींनी याअनुषंगाने झालेल्या चर्चेत सहभाग घेतला होता.

समाजातून जातीभेद दूर करा, जातीनिहाय जनगणनेची आवश्यकता काय?

आमदारांची स्वयंसेवक संघाच्या रेशीमबाग स्थित डॉ. हेडगेवार स्मृतिमंदिर परिसरास भेट

दि.१९विदर्भ प्रजासत्ताक नागपूर

हिवाळी विधिमंडळ अधिवेशनाच्या निमित्ताने उपराजधानीत आलेल्या भाजपच्या आमदारांनी मंगळवारी सकाळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या रेशीमबाग स्थित डॉ. हेडगेवार स्मृतिमंदिर परिसरास भेट दिली. पुढील वर्षी देश व राज्यात नाहीत निवडणूक असल्याने संघातर्फे काय मार्गदर्शन करण्यात येते याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले होते. परंतु सर्वांना संघाच्या कार्यपद्धतीची ओळख करून देण्यावरच भर राहिला. संघातर्फे जास्त 'बौद्धिक' टाळण्यात आले असले तरी जनतेसोबत नाळ जोडून ठेवा आणि समाजातील जातीभेद दूर करा, असे सांगत हवा तो संदेश देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे जातीनिहाय जनगणनेची आवश्यकता काय असा सवाल संघातर्फे उपस्थित करण्यात आला.

सकाळच्या सुमारास प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वात सर्व आमदार रेशीमबाग येथील हेडगेवार स्मृतिमंदिर परिसरात पोहोचले. यात चंद्रकांत पाटील, रवींद्र चव्हाण यांच्यासह ज्येष्ठ मंत्र्यांचा समावेश होता. यावेळी सर्व मंत्री व आमदारांनी आद्य सरसंघचालक डॉ. केशव बळीराम हेडगेवार व द्वितीय सरसंघचालक गोळवलकर गुरुजी यांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेतले. त्यानंतर मार्गदर्शन वर्गाला सुरुवात झाली. संघातर्फे विदर्भ प्रांत सहसंघचालक श्रीधरराव गाडगे, कार्यवाह अतुल मोघे, महानगर संघचालक राजेश लोया हे प्रामुख्याने उपस्थित होते.

जातीव्यवस्था कालबाह्य आहे. जर जनगणनेमुळे विषमता व तेढ वाढत असेल तर त्याची गरज नाही. समाजात सामाजिक समरसता वाढली पाहिजे यावरच भर द्यायला हवा असे श्रीधर गाडगे यांनी स्पष्ट केले.

यावेळी संघ विचारधारा, कार्यप्रणाली, चालणारे उपक्रम यांची माहिती देण्यात आली. जिल्ह्याजिल्ह्यात आमदारांनी जनतेसोबत समन्वय जास्तीत जास्त कसा वाढेल यादृष्टीने कार्य केले पाहिजे, असा सल्ला यावेळी देण्यात आला. लोकप्रतिनिधींनी जनतेच्या समस्या डोळ्यासमोर ठेवूनच काम करावे. नागरी कर्तव्य, सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण, स्वदेशी या सुत्रांसाठी लोकप्रतिनिधींनी काम केले पाहिजे, असेदेखील यावेळी श्रीधर गाडगे यांनी सांगितले.भाजप आमदारांना मंथन या पुस्तकाच्या प्रती देण्यात आल्या.

मंत्र्यांचा 'दक्ष' पवित्रा

एरवी मंत्री तसेच नितेश राणे यांच्यासारखे सदस्य प्रसारमाध्यमांना सहजपणे प्रतिक्रिया देतात. मात्र संघभूमीत त्यांनी 'दक्ष' पवित्रा घेतला. येथे बोलणे योग्य होणार नाही व ती येथील परंपरा नाही, असे म्हणत त्यांनी प्रसारमाध्यमांशी बोलण्यास नकार दिला.

इंडिया आघाडीला चेहरा ठरवावा लागेल बैठकीआधी उद्धव ठाकरेंचं वक्तव्य

दि.१९विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली

विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीची आज नवी दिल्ली येथे बैठक होणार आहे. या बैठकीआधी पत्रकार परिषद घेऊन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. 'या आघाडीचा समन्वयक किंवा निमंत्रक ठरवण्याची गरज आहे. आघाडीचा एखादा चेहरा ठरवता येतो का, याचाही विचार आज ना उद्या करावा लागणार आहे,' असं मत उद्धव ठाकरे यांनी मांडलं आहे.

तुमच्या नावावर सर्वांचं एकमत झालं तर इंडिया आघाडीचं नेतृत्व करणार का, असा प्रश्नही या पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरेंना विचारण्यात आला. त्यावर बोलताना ते म्हणाले की, उगाच काही तारे तोडण्याची गरज नाही. सगळ्यांशी बोलू आणि चर्चा करू. मी या बैठकीत काही गोष्टी सुचवणार आहे. पण मी हरभऱ्याच्या झाडावर चढणाऱ्यांपैकी नाही. त्यामुळे तुम्हाला कल्पना आहे की मला मुख्यमंत्रिपदही एक जबाबदारी म्हणून स्वीकारावं लागलं आणि वेळ येताच मी एका क्षणात ते पद सोडलं. त्यामुळे मी कोणतीही वेडीवाकडी स्वप्न पाहणार नाहीत. माझ्यासमोर माझा देश आहे आणि देशातील जनतेची स्वप्न आहेत. आम्ही आमची वैयक्तिक स्वप्न घेऊन पुढे जाण्याचा काही उपयोग नाही,' अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी आपलं मत मांडलं.

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकांच्या निकालावर आजच्या बैठकीत चर्चा होईल. डिसेंबर महिना अर्धा संपला आहे. आता लवकरच निवडणुकीचं वर्ष सुरू होईल. वेळापत्रकाप्रमाणे एप्रिल-मे महिन्यात लोकसभेची निवडणूक होईल. या निवडणुकीच्या तयारीला आता सर्वांनी लागण्याची गरज आहे. बाकीच्यांच्या ज्या सूचना असतील त्यावर आमचं काय मत आहे, आमच्या काही सूचना आहेत, त्या आजच्या बैठकीत मांडल्या जातील, अशी माहितीही उद्धव ठाकरेंनी दिली.

नितीश कुमारांच्या पोस्टरवर दिली प्रतिक्रिया

इंडिया आघाडीच्या बैठकीआधी बिहारची राजधानी असलेल्या पाटणा इथं मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या समर्थकांनी लावलेल्या पोस्टर्सची चर्चा होत आहे. पाटण्यात लावलेल्या पोस्टरवर लिहिण्यात आलं आहे की, जर खरंच विजय हवा असेल तर एक निश्चय पाहिजे, एक नितीश पाहिजे. या पोस्टरवर प्रतिक्रिया देताना उद्धव ठाकरे म्हणाले की, आम्ही जे लोक एकत्रित आलो आहोत, त्यातील कोणाच्याही डोक्यात नेतृत्वाची हवा भरलेली नाही. आम्ही देश वाचवण्यासाठी एकत्र आलो आहोत. काल खासदारांचं निलंबन झालं, सभागृहातील चित्रही आपण पाहिलं. त्यामुळे देशातील लोकशाही शेवटच्या घटका मोजत आहे का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. ही लोकशाही जिवंत ठेवली तर देश जगेल आणि ही लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी आम्ही इंडिया आघाडी म्हणून एकत्र आलो आहोत.

मध्य प्रदेश विधानसभेतून हटवण्यात आलं पंडित जवाहरलाल नेहरुंचं तैलचित्र

दि. १९ विदर्भ प्रजासत्ताक भोपाल

मध्य प्रदेशमध्ये भाजपाचं सरकार आल्यानंतर नव्या सरकारने सोमवारी पहिलं विधानसभा विशेष अधिवेशन आयोजित केलं होतं. यावेळी सदनात असलेला पंडित जवाहरलाल नेहरु यांचं तैलचित्र हटवण्यात आलं आहे. विधानसभा अध्यक्षांच्या खुर्चीमागे दोन तैलचित्रं होती त्यातला एक महात्मा गांधींचा होतं आणि दुसरं पंडित नेहरुंचं तैलचित्र होतं.त्यातील पंडित नेहरुंचं तैलचित्र हटवण्यात आलं आहे.ज्यामुळे आता नवा वाद निर्माण झाला आहे. काँग्रेसने भाजपाव आरोप केला आहे.

मध्य प्रदेशमध्ये ही घटना घडल्यानंतर काँग्रेसने आता हा आरोप केला आहे की भाजपाला देशाचा इतिहास पुसून टाकायचा आहे. त्यामुळेच ते अशा प्रकारची कृती करत आहेत. मध्य प्रदेश काँग्रेसचे पक्ष प्रवक्ते अब्बास हाफीज यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग साईटवर पोस्ट लिहिली आहे. त्यावर त्यांनी मध्य प्रदेश विधानसभेतून पंडित नेहरु यांचं तैलचित्र हटवल्याचा निषेध नोंदवला आहे.

लोकसभेत आणखी ४९ खासदारांचं निलंबन सुप्रिया सुळेंसह अमोल कोल्हेंचाही समावेश

दि.१९विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली

संसदेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान आज पुन्हा ४९ खासदारांचं निलंबन करण्यात आलं आहे. काही दिवसांपूर्वी चार तरुण लोकसभा सभागृहात घुसल्यानंतर संसदेच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला होता. या मुद्द्यावरूनच लोकसभा आणि राज्यसभेतही विरोधी पक्षाच्या खासदारांनी आक्रमक भूमिका घेत सरकारविरोधात जोरदार हल्लाबोल केला. सुरक्षेच्या मुद्द्यावर सभागृहात आक्रमक झालेल्या खासदारांच्या निलंबनाचं सत्र सुरू असून आतापर्यंत जवळपास १४१ खासदारांचं निलंबन करण्यात आलं आहे.

लोकसभेतून आज निलंबित करण्यात आलेल्या खासदारांमध्ये महाराष्ट्रातील खासदार सुप्रिया सुळे आणि अमोल कोल्हे यांचाही समावश आहे. तसंच शशी थरूर, डिंपल यादव, कार्ती चिदंबरम यांच्यासह एकूण ४९ खासदारांना हिवाळी अधिवेशन काळापुरतं निलंबित करण्यात आलं आहे. खासदारांचं निलंबन करून सरकार लोकशाहीचा गळा घोटत असल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात येत असून सकाळपासून काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार, काँग्रेस नेते आणि खासदार राहुल गांधी यांच्यासह विविध खासदार संसद परिसरात सरकारविरोधात आंदोलन करत आहेत.

भाजपा महिला आमदाराचा सुषमा अंधारेंविरोधात हक्कभंग प्रस्ताव

दि.१९विदर्भ प्रजासत्ताक नागपूर

ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांच्याविरोधात भाजपाच्या नाशिक येथील महिला आमदार देवयानी फरांदे यांनी विधानसभेत हक्कभंगाचा प्रस्ताव मांडला. एका निनावी पत्राचा हवाला देत सुषमा अंधारे यांनी पुण्यात पत्रकार परिषद घेत फरांदेंवर आरोप केले होते. त्यावरून आमदार देवयानी फरांदे यांनी अंधारेंवर सभागृहात हल्लाबोल केला.

आमदार देवयानी फरांदे म्हणाल्या की, उबाठा सेनेच्या नेत्या सुषमा अंधारे या गल्लीबोळात लढणाऱ्या नेत्या असतील परंतु त्यांनी त्यांच्याकडे आलेल्या निनावी पत्रावरून पुण्यात माझ्याविरोधात पत्रकार परिषद घेतली. मी गेली ३० वर्ष राजकारणात विविध पदांवर लोकप्रतिनिधी म्हणून निवडून येतेय. मी आजपर्यंत कुणावरही पुरावा नसताना आरोप केला नाही. या ताईंकडे काही पुरावे असतील तर त्यांनी गृहमंत्र्यांना द्यावे. सुषमा अंधारे यांनी १८ नोव्हेंबरला पत्रकार परिषद घेतल्यानंतर मी त्याच दिवशी गृहमंत्र्यांना पत्र देऊन आरोपांची चौकशी करावी अशी मागणी केली.पोलीस आयुक्तांनाही पत्र दिले. गेली ४ अधिवेशन मी सातत्याने ड्रग्सविरोधात लढा देतेय. नाशिकला ड्रग्समुक्त करण्यासाठी लढतेय असं त्यांनी सांगितले.

तसेच माझ्याकडे असलेली ड्रग्स पेडलरची माहिती पोलिसांना दिली त्यानंतर सोलापूरपासून नाशिकपर्यंत ड्रग्सचे कारखाने उघडकीस आले. मी या विषयावर सातत्याने बोलतेय. मात्र ललित पाटील हे उबाठा सेनेचे असल्याने माझ्यावर खोटे आरोप केले जात आहेत. याबाबत मी पुराव्यासह विधानसभेत हक्कभंग सुषमा अंधारेंवर दाखल करावा अशी मागणी केली. त्यावर विधानसभा अध्यक्षांनी माझ्याकडे तुम्ही प्रस्ताव सादर करा. मी तपासून उचित निर्णय घेईल असं आश्वासन दिले.

संपादकीय ......

देशाच्या सार्वभौमत्व, अखंडतेला प्राधान्य

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने ११ डिसेंबर रोजी कलम ३७० आणि ३५ (अ) रद्दबातलसंदर्भात ऐतिहासिक निर्णय दिला या निकालाद्वारे न्यायालयाने देशाची सार्वभौमता आणि अखंडतेला प्राधान्य दिले आहे, प्रत्येक भारतीयाच्या मनातही हीच भावना आहे. ५ ऑगस्ट २०१९ रोजी घेण्यात आलेला निर्णय घटनात्मक एकात्मता वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने घेण्यात आला, विघटित करण्यासाठी नव्हे, याची नोद सर्वोच्च न्यायालयाने घेतली, कलम ३७० कायमस्वरूपी नव्हते, या बाबीची दखलही न्यायालयाने घेतली.

जम्मू-काश्मीर आणि लडाखचा सुंदर निसर्ग, शांततेची अनुभूती देणारी खोरी, भव्य डोंगर कलाकारांना आणि साहसीवीरांना पिढ्यान्पिढ्या साद घालत आले आहेत. हे असे स्थान आहे, जिथे उदात्तता आणि अलौकिकता यांचा संगम होतो, जिथे हिमालय आकाशाला गवसणी घालतो आणि सरोवरे आणि नद्यांचे निखळ पाणी स्वर्ग प्रतिबिंबित करतात. मात्र, गेल्या सात दशकांपासून या ठिकाणांनी हिंसाचाराचे उग्र रूप आणि अस्थैर्य अनुभवले. दुर्दैवाने शतकांच्या वसाहतवादामुळे, आर्थिक आणि मानसिक दमनामुळे आपण एकप्रकारे गोधळलेला समाज बनलो. अतिशय मूळ गोष्टीबाबत स्पष्ट भूमिका घेण्याऐवजी आपण गोंधळाकडे नेणाऱ्या द्विधा भूमिकेला मान्यता दिली. दुर्दैवाने जम्मू आणि काश्मीर अशा मानसिकतेचा मोठा बळी ठरले, स्वातंत्र्याच्या वेळी आपल्याला राष्ट्रीय एकात्मतेची नवी सुरुवात करण्याचा पर्याय होता. त्याऐवजी दीर्घकालीन राष्ट्रीय हिताकडे दुर्लक्ष करणारा असला, तरी आपण गोंधळलेला समाज राहू देण्याचा निर्णय घेतला.

माझ्या जीवनाच्या अगदी सुरुवातीपासूनच जम्मू आणि काश्मीर आंदोलनाशी जोडले जाण्याची संधी मला मिळाली. जम्मू आणि काश्मीर हा केवळ राजकीय मुद्दा नाही, अशा वैचारिक चौकटीशी मी बांधील आहे; तर समाजाच्या आकांक्षेची दखल घेण्याचा हा मुद्दा आहे. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी नेहरू मंत्रिमंडळात महत्त्वाचे खाते सांभाळत होते आणि दीर्घकाळ सरकारमध्ये राहू शकले असते तरीही काश्मीर मुद्दयावर ते मंत्रिमंडळातून बाहेर पडले आणि त्यांनी पुढचा खडतर मार्ग स्वीकारला, जो त्याच्या जीवावर बेतला. त्यांचे प्रयत्न आणि त्यागामुळे काश्मीर मुद्दा कोट्यवधी भारतीपाशी भावनिकदृष्ट्या जोडला गेला, माझी ही कायम धारणा होती की, जम्मू आणि काश्मीरमध्ये जे काही झाले, ती देशावी आणि तिथे राहणाऱ्या ठोकांचीही मोठी फसवणूक होती, देशावरचा हा कलंक, तिथल्या लोकांवर झालेता अन्याय दूर करण्यासाठी मला जे काही करता येईल, ते करण्याची माझी तीव- इच्छा होती जम्मू आणि काश्मीरच्या जनतेची दुःखे त्यांच्या वेदना दूर करण्याचीही माझी कायमच इच्छा होती.अगदी साध्या आणि स्पष्ट शब्दांत सांगायचे तर कलम ३७० आणि ३५ (अ) हे त्यातील महत्त्वाचे अडथळे होते. असे वाटत होते की, हे अनुच्छेद म्हणजे जणू एखादी भक्कम भिंत आहे आणि त्या अद्धुथळ्यांचा त्रास होत होता, गरीब आणि दुर्बल लोकांना, अनुच्छेद ३७० आणि ३५ (अ) मुळे, जम्मू-काश्मीरच्या नागरिकांना त्यांचे हक्क आणि त्यांच्या अन्य सर्व देश बांधवांना मिळणारी, तेवढ्याच हक्काची विकासाची फळे त्यांना कधीही मिळाली नसती.

सातेफळ पोटनिवडणूकीत काँग्रेस विजयी

प्रीती तिजारेंनी केला भाजपाचा पराभव

दि.१९विदर्भ प्रजासत्ताक चांदुररेल्वे - चांदूर रेल्वे पंचायत समिती अंतर्गत सातेफळ गणातील भाजपाच्या सदस्या श्रध्दा वर्हाडे यांनी पं.स. पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त पदाकरीता झालेल्या पोटनिवडणूकीत काँग्रेसच्या उमेदवार प्रीती तिजारे विजयी झाल्या आहे. त्यांनी भाजपाच्या उमेदवार शुभांगी भालकर यांचा ४०९ मतांनी पराभव केला. गेल्या दोन निवडणुकांपासून भाजपाकडे असलेले सातेफळ पं.स. गण आता काँग्रेसने ताब्यात घेतले आहे. निवडणुकीत सुरेखा संजय चौधरी (उबाठा शिवसेना), प्रीती प्रमोद तिजारे (काँग्रेस), शुभांगी भालकर (भाजपा) यांच्यात तिरंगी लढत झाली. रविवारी झालेल्या मतदानात ५५.२६ टक्के मतदान झाले तर सोमवारी सकाळी ११ वाजता स्थानिक तहसील कार्यालयात मतमोजणीला सुरूवात झाली. यामध्ये काँग्रेसच्या उमेदवार प्रीती तिजारे यांनी पहिल्या फेरीपासून आघाडी घेत शेवटच्या चौथ्या फेरीपर्यंत आघाडी कायम ठेवली. त्यांना २ हजार ९१८ मते मिळाली तर भाजपा उमेदवार शुभांगी भालकर यांना २ हजार ५०९ मते मिळाली. तिसर्या उमेदवार सुरेखा चौधरी यांना ४७४ मतांवरच समाधान मानावे लागले. नोटाचा पर्याय १२५ मतदारांनी निवडला. या निवडणुकीत निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून एसडीओ रवींद्र जोगी तर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तहसीलदार पूजा माटोडे यांनी काम पाहले. यावेळी पोलिसांचा तगडा बंदोबस्त होता. काँग्रेस कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. विजयी उमेदवार व काँग्रेस कार्यकर्त्यांनी माजी आमदार वीरेंद्र जगताप यांच्या निवासस्थानी भेट दिली. आनंदोत्सव साजरा केला.

कळमजापुर मधून काँग्रेस उमेदवाराला ४३५ मते

पं. स. समिती सदस्यपदाचा राजीनामा देणार्या श्रध्दा वर्हाडे ह्या कळमजापुर येथील रहिवासी आहे. याच गावातून मतदान झालेल्या ६१५ मतांपैकी तब्बल ४३५ मते काँग्रेस उमेदवाराला मिळाली. भाजपा उमेदवाराला केवळ १५१ मते या गावातून प्राप्त झाली. त्यामुळे श्रध्दा वर्हाडे यांना सभापती न बनविल्याने एकप्रकारे कळमजापुरवासीयांनी भाजपाप्रती नाराजी व्यक्ती केल्याची चर्चा परिसरात ऐकावयास मिळत होती.

वरूडमध्ये सुधांशू महाराजांचा भक्ती सत्संग १६ जानेवारीला

दि.१९विदर्भ प्रजासत्ताकवरुड सांस्कृतिक नगरी वरूड शहरात प्रथमच परमपुज्य सुधांशुजी महाराज यांच्या विराट भक्ती सत्संग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घेण्याचे आवाहन विश्वजागृती मिशन समिती, वरूडचे किशोर खंडेलवाल यांनी एका प्रसिद्धी पत्रकाव्दारे केले आहे.

सांस्कृतिक नगरी वरूड शहरात प्रथमच १६ जानेवारीला परमपुज्य सुधांशुजी महाराज यांच्या विराट भक्ती सत्संग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेअसून, दुपारी १२ वाजता शहरातील केदारेश्वर मंदिर ते रामदेवबाबा लॉनपर्यंत भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. नंतर रामदेवबाबा लॉन येथे दुपारी ४ ते ६ वाजेपर्यंत परमपुज्य सुधांशु महाराज यांच्या विराट भक्ती सत्संगाचा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शहरातील अनेक मान्यवर मंडळींची समिती तयार करण्यात आली असून शहरात जय्यत तयारी सुरू झाली आहे. या संपूर्ण कार्यक्रमाला शहर, तालुका व जिल्ह्यातील सर्वच भक्तांनी लाभ घेण्याचे आवाहन विश्व जागृती मिशन समीती, वरुड व अमराती यांनी एका प्रसिद्धी पत्रकाव्दारे केले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून मोबाईल डेमॉन्स्ट्रेशन व्हॅन मार्गस्थ

दि.१९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती - आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चे अनुषंगाने ईव्हीएम व व्हीव्हीपॅटबाबत जनजागृती करण्याबाबत ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मशीनचे प्रशिक्षण, प्रसार, प्रसिध्दी व जनजागृती कार्यक्रम दि. १० डिसेंबर २०२३ ते २९ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत राबविण्याबाबत भारत निवडणूक आयोगाचे निर्देश आहेत. त्यानुसार अमरावती जिल्ह्यातील सर्व आठ मतदार संघांमध्ये प्रत्येक मतदार संघामध्ये चार ईव्हीएम व व्हीव्हीपॅट पुरविण्यात आलेल्या आहेत. या कार्यक्रमांतर्गत प्रत्येक मतदार संघाचे मुख्यालयी ईव्हीएम डेमॉन्स्ट्रेशन सेंटर उघडण्यात येऊन त्यामध्ये दोन ईव्हीएम मशीन्स प्रात्याक्षिक करण्यासाठी उपलब्ध असणार आहेत. तसेच प्रत्येक मतदार संघामध्ये प्रसिध्दीसाठी दोन मोबाईल डेमॉन्स्ट्रेशन व्हॅन (एमव्हीडी) देण्यात आल्या आहेत. व त्यामध्ये दोन ईव्हीएम मशीन्स राहणार आहेत. सर्व मतदार नोंदणी अधिकारी यांच्या कार्यालयात स्थापन केलेल्या ईव्हीएम प्रात्यक्षिक केंद्रामध्ये तसेच मोबाईल प्रात्याक्षिक व्हॅन सोबत दिलेल्या ईव्हीएम मशीनव्दारे ईव्हीएमबाबत नागरिकांना माहिती देणे तसेच मतदानाचे प्रात्याक्षिक करुन दाखवणे व होणार मतदान योग्यरित्या झाल्याबाबत पडताळणी करुन दाखविण्यात येणार आहे. व्हीव्हीपॅट बाबतची माहिती तसेच व्हीव्हीपॅटव्दारे झालेल्या मतदानाची नोंदी मतदारांच्या निदर्शनास आणून प्रत्येक मतदारांचे शंका निरसन करण्यात येणार आहे.या प्रचार, प्रसिध्दीचा एक भाग म्हणून मोबाईल डेमॉन्स्ट्रेशन व्हॅन (एमव्हीडी) आज जिल्हाधिकारी कार्यालयामधून जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या हस्ते मोबाईल व्हॅनला हिरवी झेंडी दाखवून तालुक्याच्या ठिकाणी मोबाईल डेमॉन्स्ट्रेशन व्हॅन रवाना करण्यात आली आहे. यावेळी अपर जिल्हादंडाधिकारी सूरज वाघमारे, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. विवेक घोडके, उपजिल्हाधिकारी (रोहयो) राम लंके तसेच नागरिक उपस्थित होते.

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र
EVM
CHOUDHARI LIGHT HOUSE

आरोग्य संपदा
आहार

रोज १ अंजीर खाण्याचे ७ भन्नाट फायदे, हाडे होतील मजबूत - वजनही होईल कमी

__दि.१९ विदर्भ प्रजासत्ताक__ - थंडीच्या दिवसांत आपण साधारपणे सुकामेवा खातोच. यामध्ये बदाम, काजू, पिस्ते, मनुके यांचा समावेश असतो. पण जरदाळू किंवा अंजीर यांसारखा सुकामेवा आपण खातोच असे नाही. महाग असल्याने हे जास्त आणलेही जात नाहीत. पण ड्राय अंजीर खाण्याचे आरोग्याला खूप फायदे असतात, त्यामुळे ते आवर्जून खायला हवे. अंजीरमधे कॅल्शियम, पोटॅशियम, मॅग्नीज, फायबर, ब६ जीवनसत्व, ओमेगा ३ फॅटी सिड हे घटक भरपूर प्रमाणात असतात. तर दुधात प्रथिनं, कॅल्शियम, अ, ड, क, ई ही जीवनसत्व आणि राइबोफ्लेविन हे घटक असतात. त्यामुळे आरोग्याच्या विविध तक्रारींवर अंजीर खाणे फायदेशीर ठरते. पाहूयात अंजीर खाण्याचे ७ फायदे

१. वजन कमी करणे

अंजीरामध्ये असणारा फायबर हा घटक वाढलेलं वजन कमी करण्यासाठी फायदेशीर ठरतो.

२. पोटाच्या समस्यांसाठी फायदेशीर- *अंजीरात असणारे प्रिबायोटीक गुणधर्म ज्यामुळे शरीरातील गुड बॅक्टेरीया वाढण्यास मदत होते. यामुळे पोटाशी किंवा पचनाशी निगडीत समस्या दूर होण्यास मदत होते.*

३. उच्च रक्तदाब नियंत्रणात राहण्यास मदत*अंजीरात असणारा पोटॅशियम हा घटक वाढलेला रक्तदाब कमी करण्यास मदत करतो.*

४. हाडं मजबूत होतात

हाडांसाठी आवश्यक असणारे कॅल्शियम अंजीरात भरपूर प्रमाणात असल्याने हाडं मजबूत राहण्यासाठी याचा अतिशय चांगला फायदा होतो.

५. वाढलेलं वय दिसू नये म्हणून

वय वाढलं की त्वचेवर सुरकुत्या येणे, केस पांढरे होणे अशा समस्या उद्भवतात. पण नियमितपणे अंजीर खाल्ले तर या समस्या दूर होण्यास मदत होते आणि तुम्ही दिर्घकाळ तरुण दिसता.

हॉर्मोन बॅलन्सिंगसाठी फायदेशीर

अंजीरामध्ये लोह, झिंक, मॅग्रेशियम आणि मॅंगनीज असते त्यामुळे हार्मोन्स बॅलन्स होण्यास त्याची चांगली मदत होते. तसेच लैंगिक आरोग्य सुधारण्यासही याचा चांगला फायदा होतो.

७. श्वसनाशी निगडीत समस्या

श्वसन मार्गातील अडथळे दूर करुन श्वसनाशी निगडीत समस्या सुरळीत करण्यासाठीही अंजीर खाण्याचा चांगला उपयोग होतो.

कुलगुरूपदाच्या उमेदवारांना मुलाखत पत्राची प्रतीक्षा

दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या नवव्या कुलगुरू पदासाठी एकूण ११५ उमेदवारांपैकी ७५ अर्ज बाद झाल्याची विश्वसनीय माहिती आहे. आता ४० उमेदवार कुलगुरू पदासाठी मैदानात असून, कुणाला मुलाखतीचे पत्र जाते आणि कुणाची लॉटरी लागते, हे डिसेंबरअखेर स्पष्ट होणार आहे.पुणे येथे ४ डिसेंबर रोजी

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

कुलगुरू निवड समितीची पहिली बैठक पार पडली. कागदपत्रांच्या तपासणीनंतर पात्र उमेदवारांची यादी तयार करण्यात आली आहे. कुलगुरू पदासाठी महाराष्ट्र, दिल्ली, मध्य प्रदेशातूनही अर्ज असल्याची माहिती आहे. शासनाने विद्यापीठाच्या नवीन कुलगुरू निवडीसाठी चार सदस्यीय समितीचे गठन केले आहे. त्यात अध्यक्षपदी

कानपूर येथील आयआयटीचे डॉ. संजय धांडे तर सदस्य म्हणून सुरत येथील एसव्हीएनआयटीचे डॉ. अनुपम शुक्ला, लखनौ विद्यापीठाचे डॉ. मनोज दीक्षित दीक्षित तर नोडल अधिकारी म्हणून पुणे येथील शासकीय अभियांत्रिकीचे डॉ. सुजित परदेशी यांचा समावेश आहे.

समितीच्या घेणार निर्णय

अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरु पदासाठी अर्जाची समितीकडून छाननी आटोपली. आता केवळ ४० अर्जाचा विचार होणार आहे. लवकरच उमेदवारांच्या मुलाखती घेण्याचे नियोजन आहे. त्यानंतर समितीच्या बैठकीनंतर पाच उमेदवारांची शॉर्ट लिस्ट तयार होणार असून, हीच अंतिम यादी राजभवनकडे पाठवली जाणार आहे.

तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन

माध्यमिक विद्यालय राजुरा येथे २० व २१ डिसेंबरला विज्ञान प्रयोगांची मेजवानी

दि.१९विदर्भ प्रजासत्ताक चांदुर रेल्वे - तालुक्यातील राजुरा येथील माध्यमिक विद्यालय व स्व. खंडेराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय येथे दिनांक २० व २१ डिसेंबर २०२३ रोजी दोन दिवसीय विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन केले आहे. शिक्षण विभाग पंचायत समिती चांदूर रेल्वे, तालुका मुख्याध्यापक संघ,विज्ञान अध्यापक मंडळ,माध्यमिक विद्यालय राजुरा व श्रीराम विद्यालय बोरी यांच्या संयुक्त विद्यमाने या तालुका विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. विज्ञान प्रदर्शनीचे उद्घाटन २० डिसेंबर रोजी सकाळी दहा वाजता पंचायत समिती सभापती प्रशांत भाऊ भेंडे यांचे हस्ते होणार असून यावेळी विदर्भ युथवेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे हे अध्यक्षस्थानी राहणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीचे उपाध्यक्ष उदय देशमुख, युवराजसिंग चौधरी, नितीन हिवसे, वैशालीताई धांडे ,प्रा.डॉ. हेमंत देशमुख, शंकरराव काळे,रागिणीताई देशमुख,डॉ. सौ. पूनम चौधरी,अशोकराव गुल्हाने,गटविकास अधिकारी संजय खारकर व गटशिक्षणाधिकारी संदीप बोडके उपस्थित राहणार आहेत.

यावेळी उद्घाटन सोहळ्याला विशेष अतिथी म्हणून चांदूर रेल्वे पंचायत समितीचे उपसभापती शुभांगीताई खंडारे ,माजी सभापती श्रीमती सरिता देशमुख,सदस्य प्रतिभाताई डांगे, अमोल होले ,राजुराच्या सरपंच अंजलीताई गजभिये, उपसरपंच अलकाताई कातकिडे ,पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष सिद्धेश्वर राऊत शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष निलेश बांडाबुचे हे उपस्थित राहणार आहेत. २१ डिसेंबर रोजी सकाळी विज्ञान प्रश्नमंजुषा व प्रदर्शनी मूल्यमापन होणार असून दुपारी अडीच वाजता समारोप कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी शिक्षणाधिकारी वा.ग.बोलके तर प्रमुख वक्ते म्हणून अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा सचिव हरीश केदार हे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून माध्यमिक उपशिक्षणाधिकारी प्रिया देशमुख, गटशिक्षणाधिकारी संदीप बोडखे, पोषण आहार अधीक्षक विनोद गजभिये, विस्तार अधिकारी अश्विन मानकर ,रवींद्र चव्हाण, विनायक देशमुख आदी मान्यवरांची उपस्थिती राहील. यावेळी संत गाडगेबाबा अध्यासन केंद्राचे डॉ. दिलीप काळे यांचे तर्फे संत गाडगेबाबांच्या दुर्मिळ छायाचित्र प्रदर्शनी राहणार आहे.असे आयोजन समितीतील मुख्याध्यापक ए.बी.आखरे, आर.आर.मस्के,पी.एस.तळोकार,स्वप्नाली चौखंडे, श्रीनाथ वानखडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

अवकाळीच्या नुकसानीचे पंचनामे रखडले!

दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती– नोव्हेंबर महिन्यात २८ ते ३० दरम्यान झालेल्या अवकाळी पावसामुळे जिल्ह्यातील १ लाख ६५ हजार ३६० हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले आहे. या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याचे सरकारचे आदेश असले तरी आतापर्यंत निम्मेच पंचनामे झाले आहेत. महसूल विभागाच्या तहसील पातळीवर सहकार्य मिळत नसल्याने पंचनामे रखडले आहेत, अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे.नोव्हेंबर महिन्यात झालेल्या अवकाळी पावसाने खरिपातील तूर व कापसासह रब्बीतील गहू, हरभरा, कांदा या पिकांचे नुकसान झाले आहे. यासोबतच या पावसाचा पानपिंपरी व संत्र्यासह केळी या फळबागांनाही फटका बसला आहे. महसूल प्रशासनाने नुकसानीच्या प्राथमिक अंदाजात २८ हजारांवर हेक्टर क्षेत्रात नुकसान झाल्याचे म्हटले होते. जिल्ह्यातील तीनच तालुक्यात नुकसान झाल्याचा महसूल प्रशासनाचा प्राथमीक अहवाल होता त्यानंतर जिल्ह्यातील सर्वच १४ ही तालुक्यातून तक्रारी येऊ लागल्याने कृषी विभागाने केलेल्या पाहणीत जिल्ह्यात १ लाख ६५ हजार ३६० हेक्टर मध्ये नुकसान झाल्याचे समोर आले. हा अहवाल जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाने नि जिल्हा प्रशासनास पाठवून संयुक्त सर पंचनाम्यासाठी विनंतीही केली. झालेल्या एकूण नुकसानग्रस्त क्षेत्रापैकी अंति आतापर्यत ८१,१०० हेक्टर क्षेत्रातील मदत नुकसानीचे पंचनामे झाले आहेत.अद्यापही ७९ हजार २६० हेक्टरमधील पंचनामे होणे शिल्लक आहेत.

संयुक्त पंचनामे करण्यासाठी तहसील पातळीवरुन मनुष्यबळ उपलब्ध होणे आवश्यक आहे; मात्र तहसीलदार यांच्यासह तलाठी या कामात सहकार्य करीत नसल्याच्या तक्रारीसमोर आल्या आहेत. या कामात त्यांना स्वारस्य नसल्याचे सांगण्यात येत आहे. यापूर्वी तलाठ्यांच्या व नंतर – तहसीलदार व नायब तहसीलदार यांच्या संपामुळे पंचनामे रखडले होते.

राज्य सरकारने नुकसानीचे – पंचनामे तातडीने करण्याचे आदेश दिले – आहेत. त्याला पंधरवडा उलटला आहे. ३ टक्केवर नुकसानग्रस्तांना राज्य आपत्ती व्यवस्थापन समितीच्या निकषानुसार हेक्टरी मदत देण्याचे सरकारचे आश्वासन आहे; मात्र पंचनामे रखडले असल्याने नुकसानीचे अंतिम अहवाल कधी सादर होणार व न मदत कधी शेतकऱ्यांना मिळणार, हा – प्रश्न निर्माण झाला आहे.

लोकसभेपूर्वी होणार महसूल अधिकाऱ्यांच्या बदल्या

शासनाने मागविली पात्र अधिकाऱ्यांची माहिती

दि१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती: लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या उपजिल्हाधिकारी तहसीलदार व नायब तहसीलदार या महसूल अधिकाऱ्यांच्या जिल्ह्यात बदल्या करण्यात येणार आहेत. हे अधिकारी सध्या कोणत्या पदावर कार्यालयात आणि गट पाच वर्षांत कोठे कोठे काम केले आहे. अधिक माहिती जिल्हा प्रशासनाने राज्य शासनाकडे पाठविण्यात येणार आहे जानेवारी महिन्यात बदल्या होण्याची शक्यता आहे. लोकसभा निवडणुकीचा बिगुल फेब्रुवारी किंवा मार्च महिन्यात वाजण्याची शक्यता आहे. त्यामुळे भारत निवडणूक आयोगाकडून लोकसभा निवडणुकीची पूर्वतयारी जोरात सुरू आहे. त्यानंतरसहा महिन्यांत विधानसभेची निवडणूक होणाऱ्या या दोन्ही निवडणुकांसाठी जिल्हाधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी तहसीलदार आणि नाहीत तहसीलदार यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी असते. लोकसभेसाठी उपजिल्हाधिकारी हे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तर तालुका तहसीलदार यांना त्यांचे सहायक म्हणून काम करावे लागते अधिकारी जिल्ह्याचा रहिवासी असल्यास स्थानिक राजकीय नेते मंडळींची त्यांची जवळीक असते त्यामुळे निवडणूक कामात पारदर्शकपणा येणार नाही अशी निवडणूक आयोगाला वाटते, त्यामुळे जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या महसूल अधिकाऱ्यांच्या बदल्यांची प्रक्रिया सुरू झाली आहे.

१ जानेवारीपासून रामजन्मभूमी निमंत्रण अभियान

अक्षता वाटपासाठी रा. स्व. संघाची समन्वय बैठक

दि.१९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती, येत्या २२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्या येथील भव्य श्रीराम मंदिर लोकार्पण समारंभ , जनजागृती व लोकसहभाग निमित्त भारतातील प्रत्येक घरात अक्षता व निमंत्रण देण्याचे आवाहन केले आहे. त्याकरिता संपूर्ण देशभरात 'व्यापक गृह संपर्क अभियान' राबवण्यात येणार आहे. १ ते १५ जानेवारी या कालावधीत अमरावती शहरात सर्वत्र मोठ्या प्रमाणात विविध उपक्रम करण्याचे आवाहन विश्व हिंदू परिषद व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने रविवारी आयोजित अमरावती महानगर समन्वय बैठकीत केले.

या समन्वय बैठकीला महानगर संघचालक उल्हास बपोरीकर, विदर्भ प्रांत सामाजिक सद्भाव संयोजक उमेश पिंपळकर, विदर्भ प्रांत शारीरिक शिक्षण सहप्रमुख पंजाब आव्हाळे प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विदर्भ प्रांत शारीरिक शिक्षण प्रमुख प्रशांत दाणी यांनी या उपक्रमात जास्तीत जास्त हिंदू समाजाला कसे सम्मिलित करून घेता येईल, या बद्दल सर्व पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. विश्व हिंदू परिषदेचे अमरावती विभाग प्रमुख बंटी पारवानी यांनी प्रास्ताविक केले.तसेच विहिंपचे अमरावती महानगर प्रमुख व अभियानाचे प्रमुख चेतन वाटणकर यांनी अभियानाचे टप्पे व योजना सांगितली.

गृह संपर्क अभियानाचे अमरावती महानगराचे प्रमुख म्हणून चेतन वाटणकर, सहप्रमुख प्राध्यापक गौरव काकडे व योगेशजी गुल्हाने राहणार आहे. बैठकीला ज्ञानेश्वर महाराज पातशे प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी आठही नगरांना अक्षतांचे कलश वाटप करण्यात आले. या समन्वय बैठकीला विविध क्षेत्रांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावर्षीचे शेवटचे दिवस बोचणाऱ्या गारठ्यात जाणार

दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती – उत्तर भारतात सध्या प्रचंड थंडीची लाट पसरली आहे. पारा ४ ते ८ अंशावर घसरला असून बर्फासह धुक्याची चादर पसरली आहे. उत्तरेकडून थंड वारे वाहून नेण्यासाठी अनुकूल असलेले कमी दाबाचे क्षेत्र सध्या मध्य प्रदेश व महाराष्ट्रावर अस्तित्वात येत आहे. त्यामुळे यावर्षीचे शेवटचे दिवस बोचणाऱ्या गारठ्यात जाण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. या अंदाजानुसार विदर्भातील संपूर्ण ११ व खान्देशातील ३ जिल्ह्यासह नाशिक नगर छ.संभाजीनगर, जालना, बीड नांदेड हिंगोली परभणी अश्या महाराष्ट्रातील २२ जिल्ह्यात दिवसा-रात्रीच्या थंडीतही वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विदर्भातील पहाटेचे किमान तापमान हे १० ते १२ डिग्री सेल्सियस किंवा त्याखाली जाण्याची शक्यता आहे. महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्यात किमान तापमान सरासरी १२ ते १४ अंशाच्या आसपास राहण्याचा अंदाज आहे. या सर्व जिल्ह्यात कमाल तापमानही सरासरीच्या खाली जाण्याची शक्यता आहे. मध्य

प्रदेशाबरोबर जोरदार ईशान्य थंड वारे महाराष्ट्राच्या भू-भागावर ओढले जाण्याची शक्यतेमुळे कडाक्याच्या थंडीचा प्रभाव या भागात जाणवणार आहे. मात्र यावर्षी हिवाळी हंगामात शीत-लहरींची संख्याही दरवर्षीपेक्षा कमी असण्याची शक्यता आहे.

दरम्यान सोमवारी अमरावती सह विदर्भात सर्वत्र कमाल व किमान तापमानात अंशत: घसरण झाली. अमरावती रात्रीचा पारा १६.८ अंशावर गेला. कमाल पारासुद्धा सरासरीच्या २ अंशाने खाली २६.८ अंशावर आहे. १२ अंश किमान तापमानासह गडचिरोली सर्वात थंड तर गोंदियामध्ये पारा १२.५ अंशावर होता. इतर जिल्ह्यात रात्रीचे तापमान १३ अंशाच्यावर म्हणजे सरासरीत आहे. अमरावतीत सकाळी आकाशात ढगांची गर्दी जमली होती, ज्यामुळे सूर्याचे दर्शन नागरिकांना थोडे उशीराच झाले. आकाशात ढग व खाली थंड वातावरणामुळे लोकांना हुडहुडी भरली होती. त्यामुळे कधी सूर्य निघतो, याची प्रतीक्षा लागली होती. त्यानंतर दिवसभर तुरळक ढगांची हजेरी होती. सायंकाळी तापमान पुन्हा घसरले.

३ हजार सेवेकरी सांभाळतात भोजन प्रसाद ची जवाबदारी

हनुमान गढीत भव्य स्वयंपाक गृह

दि.१९विदर्भ प्रजासत्ताक हनुमानगढी अमरावती – दररोज सकाळ व संध्याकाळ भोजन प्रसाद देण्यात येत आहे. सलग तीन दिवसापासून ते सुरू असून आणखी दोन दिवस म्हणजे १९ व २० डिसेंबरला भोजन प्रसादाचे वितरण होणार आहे. स्वयंपाक तयार करण्यासाठी १३० भट्टी तयार करण्यात आल्या आहे. जवळपास ३०० आचारी व तेवढेच त्यांचे सहकारी आणि ३ हजार सेवेकरी भोजन प्रसाद तयार करीत आहे. या भोजनकक्षाकडे राणा दाम्पत्याचे विशेष लक्ष आहे. खा. नवनीत या सुद्धा दिवसरात्र सेवा देणार्यांसोबत वेळातला वेळ काढून काम करीत आहे. पोळ्या लाटणे, भाजी करणे, भाज्या चिरून देणे, स्वयंपाकाची भांडी घासून आपली सेवा त्या प्रदान करीत आहे. अन्नपूर्णा मातेच्या कृपेने भाविकांना स्वादिष्ट, रुचकर व आरोग्यदायी भोजन प्रसाद देण्यात येत आहे. येथे कुणीही उपाशी राहू नये व प्रत्येकाला पोटभर अन्न मिळावे यासाठी आयोजक प्रयत्न करीत आहे.

शेतकरी कुटुंबियांनी केली आरती

जे कोणीच करू शकत नाही ते देवाधिदेव महादेव करतात. देवाची शक्ती, मनापासून भक्ती आणि मानवाची सहनशक्ती हा त्रिवेणी संगम असला की कुठल्याही अडचणीवर मात करता येते, असे हनुमान गढी येथील शिवमहापुराण कथेच्या तिसर्या दिवशी पंडित प्रदीप मिश्रा यांनी सांगितले. भाविकांची आलोट गर्दी होती. कथा श्रवणाचा लाभ भक्त घेत होते. जिकडे बघावे तिकडे भक्तांचाच महाकुंभ दिसत होता. राणा दाम्पत्याने सोमवारी विदर्भातील आत्महत्या केलेल्या शेतकर्यांचा पत्नी व कुटुंबीयासमवेत महाआरती केली.

पश्चिम विदर्भात जलसाठा ७३ टक्क्यांवर

गतवर्षीच्या तुलनेत १४ टक्के कमी पाणी

दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,– यंदा डिसेंबरच्या मध्यावर पश्चिम विदर्भातील लहान-मोठ्या धरणांमध्ये २ हजार २७५ दशलक्ष घनमीटर अर्थात ७३.९८ टक्के जलसाठा शिल्लक असून गेल्यावर्षीच्या तुलनेत प्रमाण १४ टक्क्यांनी कमी आहे.

यंदा काही भागात पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने अनेक सिंचन प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरले नव्हते. काही प्रकल्प मात्र तुडुंब भरले. सप्टेंबरअखेर विभागातील सर्व प्रकल्पांमध्ये ८१.७१ टक्के जलसाठा झाला होता. मध्यंतरीच्या काळात पिण्यासाठी आणि सिंचनासाठी पाणी वापरात असल्याने धरणातील पाणीसाठा हा हळूहळू कमी होत आहे. अमरावती शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या अप्पर वर्धा धरणात ४८२.८५ दलघमी म्हणजे ८५.६० टक्के पाणीसाठा असून अमरावतीकरांना पाणीटंचाईची भीती बाळगण्याची गरज नाही, असे जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. गेल्यावर्षी याच कालावधीत अप्पर वर्धा धरणात ८५.९० टक्के पाणीसाठा होता. यंदा सप्टेंबर अखेर अप्पर वर्धा पूर्ण क्षमतेने भरले होते.अमरावती विभागातील एकूण ९ मोठ्या प्रकल्पांची संकल्पित पाणीसाठा हा १३९९ दलघमी इतका असून सध्या १०१७ दलघमी अर्थात ७२.६८ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. २७ मध्यम प्रकल्पांची संकल्पित पाणीसाठा ७७१ दलघमी आहे. सध्या ५८४ दलघमी म्हणजे ७५.८२ टक्केपाणीसाठा आहे. लघु प्रकल्पांमध्ये यंदा मात्र समाधानकारक जलसाठा होऊ शकलेला नाही. सध्या २४६ लघु प्रकल्पांमध्ये ६७३ दलघमी म्हणजे ७४ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. उन्हाळा संपेपर्यंत सिंचनासाठी यंदा जपून पाणी वापर करावा लागणार आहे.

सिंचनाची मागणी वाढली

पर्जन्यमान कमी राहिल्याने धरणांमध्ये आधीच कमी जलसाठा असताना सिंचनासाठी आणि औद्योगिक वापरासाठी पाण्याची मागणी वाढली आहे. अपूऱ्या पावसामुळे अनेक तालुक्यांमध्ये पाण्याचे दुर्भिक्ष्य होते. हिवाळ्यातच पाणीटंचाईचे सावट आहे. डिसेंबरच्या मध्यावर धरणांमध्ये ७३ टक्के पाणीसाठा आहे. विभागातील प्रमुख शहरे ही पिण्याच्या पाण्यासाठी धरणांवरच विसंबून आहेत. त्यामुळे पाण्याचे काटेकोर नियोजन करावे लागणार आहे.

१ किलो सोनं, ७ किलो चांदी आणि अनमोल रत्नांनी सजवल्या रामलल्लाच्या पादुका

२३ जानेवारीपासून सर्वसामान्य भाविकांसाठी दर्शन सुरु

दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या – तब्बल १ किलो सोनं आणि ७ किलो चांदीचा वापर करत श्रीरामाच्या पादुका तयार करण्यात आल्या आहेत. या पादुका सध्या एसजी हायवेवरील तिरूपती बालाजी मंदिरात दर्शनासाठी ठेवण्यात आल्या आहेत. अयोध्येत येत्या २२ जानेवारीला राम मंदिराचं उद्घाटन होणार आहे. त्याआधी १९ तारखेलाच या पादुका अयोध्येत दाखल होतील. हैदराबादमधील श्री चल्ला श्रीनिवास शास्त्री यांनी या पादुका तयार केल्या आहेत. तर सोन्या चांदी व्यतिरिक्त या पादुका तयार करताना बहुमुल्य रत्नांचा त्यात वापर करण्यात आला आहे. रविवारी पादुका रामेश्वरधामहून अहमदाबादला आणण्यात आल्या होत्या.

अयोध्येला २२ जानेवारी राम मंदिराचे उद्घाटन होणार आहे.त्याआगोदर १९ जानेवारीला या पादुका अयोध्येला पोहचणार आहे.या पादुका हातात घेऊन श्री चल्ला श्रीनिवास अयोध्या निर्माणधीन मंदिराची ४१ दिवसाची परिक्रमा देखील पूर्ण केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्य हस्ते अयोध्येला प्राणप्रतिष्ठापणा केली जाणार आहे. या सोहळ्यासाठी २५०० पाहुण्यांची लिस्ट तयार केली आहे. त्याशिवाय ४००० साधुसंतांना देखील या सोहळ्यासाठी आमंत्रित केले आहे. २३ जानेवारीपासून मंदिर भक्तांसाठी खुले राहणार आहे.

२३ जानेवारीपासून सर्वसामान्य भाविकांसाठी दर्शन सुरु होणार

अयोध्येत रामलल्लाच्या अभिषेकापूर्वी तीन दिवस भाविकांना दर्शन घेता येणार नाही. मकर संक्रांतीनंतर २२ जानेवारीला रामलल्ला भव्य मंदिरात विराजमान होणार आहे. २० आणि २१ जानेवारीला कोणत्याही भाविकांना प्रभू रामाचे दर्शन घेता येणार नाही. या दिवशी फक्त प्राण प्रतिष्ठा सोहळ्याला निमंत्रित झालेल्यांनाच रामलल्लाचे दर्शन घेण्याची संधी मिळणार आहे. २३ जानेवारीपासून सर्वसामान्य भाविकांना भव्य राम मंदिरात दर्शन घेता येणार आहे. या काही दिवसांत मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे संपूर्ण भारतातून रामलल्लाचे भाविक दर्शनासाठी हजेरी लावण्याची शक्यता आहे.

गोवंश तस्करांवर पोलिसांची धडक कारवाई

५८ जनावरे, ४ दुचाकींसह ६ जणांना अटक

१० लाखाचा मुद्देमाल ताब्यात

दि.१९विदर्भ प्रजासत्ताक धारणी, तालुक्यातून हिवरखेड आणि अकोट (जि. अकोला) कडे चोरट्या मार्गाने व्याघ्र प्रकल्पाच्या जंगलातून गोवंशाची सतत तस्करी होत असल्याने पो. नि. अशोक जाधव यांनी झांझरीढाणा गाव शिवारातील जंगलात ५८ जनावरे व ४ दुचाकींसह ६ तस्करांना रंगेहात पकडल्याने मेळघाट व अकोला जिल्ह्यात एकच खळबळ उडालेली आहे. पकडण्यात आलेल्या तस्करांमध्ये हिवरखेड व धारणीचे आरोपी आहेत.

धारणी तालुका आणि मध्य प्रदेशच्या सीमावर्ती भागातून अकोट येथे हिवरखेड मार्गाने नेहमी गोवंशाची तस्करी मेळघाटच्या प्रतिबंधित व्याघ्रच्या मार्गाने होत असते. धारणी पोलिसांनी पोलिस अधीक्षक विशाल आनंद आणि प्रभारी उपविभागीय पोलिस अधिकारी विक्रम साळी तथा अतुलकुमार नवगीरे यांच्या मार्गदर्शनात रविवारच्या रात्री सरळ धडक कारवाई करताना ५८ गोवंशाची तस्करी पकडली. ४ दुचाकी आणि जनावरांची एकूण किंमत ९ लक्ष ५३ हजार आखण्यात आलेली असून आरोपी शरीफ अ. लतिफ रा. धुळघाट ता. धारणी, अरबन खान, अयुब खान, मो. सोहेल, मो. सुल्तान, काजीमुद्दीम इकरामुद्दीन, अन्सार खाँ शमशेर खाँ आणि शे. असलम हासम सर्व रा. हिवरखेड, ता. अकोट, जि. अकोला यांना जेरबंद करण्यात आले आहे.

सर्व जनावरांना अत्यंत क्रुरतेने बांधून कत्तलीसाठी नेण्यात येत असताना पकडण्यात आले. ५८ जनावरांना धारणी तालुक्यातील बाबंदा येथील वंदे मातरम् गौरक्षण संस्थेकडे देण्यात आलेले असून रोशन सोनोने गोवंशाची देखरेख करत आहे. या कारवाईत ठाणेदार जाधव यांच्या नेतृत्वात पोलिस उपनिरीक्षक ईश्वर सोळंके, उपनिरीक्षक रिना सदार, एएसआय विनोद मर्धाळे, साबुलाल दहीकर, संजय मिश्रा, अनिल जांबेकर, प्रेमानंद गुळधे, मोहित आगाशे, राम सोळंके, जगन तेलगोटे, विकास वाकोडे, गजू जामनिक यांनी भाग घेतला. विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून सर्व आरोपींना न्यायालयात उपस्थित करण्यात आले. गौरक्षण संस्थेचे आप्पा पाटील यांनी पोलिसांचे अभिनंदन केले आहे. लवकरच मोठ्या कारवाईचे संकेत प्राप्त झाले आहे.

अनधिकृत शाळा सुरू झाल्यास शिक्षणाधिकाऱ्यावर कारवाई

राज्य शासनाचा शासन निर्णय जारी

दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती– अमरावती जिल्ह्यांत अनधिकृत शाळा सुरू झाल्यास संबंधित शिक्षणाधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल तसेच त्यांच्याविरोधात शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार असल्याचे शालेय शिक्षण विभागाच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे.

राज्य शासनाची मान्यता नसतानाही अनधिकृतरीत्या शाळा सुरू करून विद्यार्थी, पालक आणि शासनाची फसवणूक होत असल्याचा प्रकार काही जिल्ह्यांत उघडकीस आला होता. त्यानंतर शिक्षण आयुक्त सुरज मांढरे यांनी राज्यातील अनधिकृत शाळांवर कारवाई करण्याचा निर्णय घेतला तसेच प्रत्येक जिल्ह्यांतील शाळांच्या मान्यता पत्राची पडताळणी करण्याचे आदेश दिले होते. राज्य तसेच पुणे जिल्ह्यांत अनेक शाळा अनधिकृत असल्याचे निर्दर्शनास आले.

दरम्यान, महाराष्ट्र स्वयंअर्थसहय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम , २०१२ तसेच नियम २०२० अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा दर्जात वाढ करण्यासाठी कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. परंतु, अनेक संस्थांनी शासनाची मान्यता न घेता अनधिकृतपणे शाळा सुरू केल्याचे निर्दर्शनास आले आहे. आशा अनधिकृतपणे सुरू असलेल्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेता भविष्यात यापुढे अनधिकृत शाळा सुरू होऊ नयेत याकरिता सूचना निर्गमित करण्याबाबत राज्यशासन विचार करीत होते. त्यानुसार यापुढे जिल्ह्यांत अनधिकृत शाळा सुरू असेल तर त्यास शिक्षणाधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल आणि त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार असल्याचे निर्णय घेण्यात आला आहे. सोमवार दि. १८ रोजी राज्य शासनाचे अवर सचिव प्रविण मुंढे यांनी या संदर्भात शासन निर्णय जारी केला आहे.

नोव्हेंबर चे वेतन रोखल्याने महापालिका कर्मचाऱ्यांचा संप चिघळणार

दि.१९विदर्भ प्रजासत्ताकअमरावती – अमरावती महापालिका कर्मचाऱ्यांनी पुकारलेले कामबंद आंदोलन चिघळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. संपकर्त्यांचे नोव्हेंबर महिन्याचे वेतन रोखण्यात आल्याने कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. अशातच आयुक्तांनी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना भेटण्यास व पुन्हा चर्चेस नकार दिल्याने आता मागण्या पूर्ण होईस्तोवर माघार न घेण्याचा निर्धार कर्मचारी संघटनेने व्यक्त केला आहे.गुरुवार १४ डिसेंबर संप सुरू असल्याने मनपातील कामकाज ठप्प पडले असून नागरी सेवा विस्कळीत झाल्या आहेत. कंत्राटी कर्मचारी कामावर असले तरी विभागप्रमुख संपात सहभागी झाल्याने निर्णय ठप्प आहेत. सेवाज्येष्ठता, पदोन्नती, सातव्या वेतन आयोगातील फरकाची बकबाकी यासह बारा मागण्यांसाठी मनपा कर्मचारी व अधिकाऱ्यांनी गुरुवारपासून बेमुदत कामबंद आंदोलन छेडले आहे. आयुक्तांसोबत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची एकवेळ चर्चा झाली; मात्र ती निष्फळ ठरल्याने संपाची कोंडी फुटू शकली नाही. त्यानंतर दोन दिवस शासकीय सुट्या असल्याने शुक्रवारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी स्वतः आयुक्तांना भेटण्याचा प्रयत्न केला. आर्थिक नसलेल्या मागण्या मान्य करण्याची विनंती व चर्चा करण्यासाठी संघटनेचे पदाधिकारी आयुक्तांकडे गेले होते, मात्र त्यांनी भेटण्यास नकार दिल्याचे संघटनेचे महासचिव प्रल्हाद कोतवाल यांनी सांगितले. याउलट आयुक्तांनी कर्मचाऱ्यांचे नोव्हेंबर महिन्याचे वेतन रोखून धरल्याचेही कोतवाल यांनी सांगितले.मागण्यापूर्ण होईस्तोवर कामावर न परतण्याचा निर्धार मनपा कर्मचारी व अधिकारी यांनी जाहीर केला आहे, तर मनपाची आर्थिक स्थिती बघता कर्मचाऱ्यांनी कामावर परतण्याचे आवाहन आयुक्तांनी केले आहे.

काँग्रेसच्या स्थापना दिनानिमित्त नागपुरात २८ डिसेंबर रोजी महासंमेलन

ग्रामीण भागातून १५ हजार कार्यकर्ते सहभागी होणार, जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी घेतला नियोजनाचा आढावा

दि१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती, अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या १३८ व्या स्थापना दिनानिमित्त काँग्रेस पक्षाचे महासंमेलन नागपूर येथे २८ डिसेंबर रोजी दुपारी १.३० वा. आयोजित करण्यात आले आहे.या अधिवेशनाला राष्ट्रीय अध्यक्ष खा. मल्लिकार्जुन खरगे,काँग्रेस संसदीय दलाच्या अध्यक्षा खा. सोनिया गांधी, खा. राहुल गांधी,प्रियंका गांधी यांची प्रमुख उपस्थिती राहणार असुन या संमेलनात ग्रामीण भागातून १५ हजार कार्यकर्ते सहभागी होणार आहे. याबाबतचा पूर्वनियोजनाचा आढावा सोमवारी जिल्हाध्यक्ष बबलु देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेस भवन येथे घेण्यात आले.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस खा. के. सी. वेणुगोपाल यांच्या प्रमुख उपस्थितीत व प्रांताध्यक्ष नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली या महासंमेलनाच्या नियोजनासंदर्भात नुकतीच नागपूर येथे बैठक पार पडली. त्यामुळे आता जिल्हास्तरावरून देखील नियोजनाबाबत बैठकांच्या आयोजन केले जात आहे. अशातच काँग्रेस भवन येथे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली संमेलनाच्या नियोजनाची तयारी करण्यात आली.यावेळी बाळासाहेब हिंगणीकर,सुधाकर भारसाकडे, हरिभाऊ मोहोड,दयाराम काळे,प्रदीप देशमुख, कांचनमालाताई गावंडे,पंकज मोरे,यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. या महासंमेलानासाठी राज्यातून १० लाख कार्यकर्त्यांची उपस्थिती राहणार आहे.तर जिल्ह्यात आ. यशोमती ठाकुर व जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, आ. बळवंत वानखडे, माजी आमदार वीरेंद्र जगताप यांच्या यांच्या नेतृत्वात १५ हजारांवर कार्यकर्ते नागरपुरला हजेरी लावणार आहे.याच्या नियोजनाची बैठक जिल्हाध्यक्ष बबलु देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी पार पडली. यावेळी त्यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना या महासंमेलनाची माहीती देत तालुकास्तरावरून देखील हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते नागपुराला नेण्याचे नियोजन केले. यावेळी बैठकीला प्रकाश चव्हाण, मुकद्दर खाँ पठाण, गिरीश कराळे,संजय वानखडे,श्रीकांत गावंडे, धनंजय देशमुख, विनोद चौधरी,प्रदीप देशमुख, दिलीप काळबांडे, सेतू देशमुख, संजय बेलोकार, अतिश शिरभाते, सुनील गावंडे, प्रदीप विठ्ठल देशमुख, बिट्टू मंगरोळे, डॉ. दुर्गे, किशोर देशमुख, प्रशांत गोरले, मामराज कडू, विनोद पवार, ईश्वर बुंदेले, साहेबराव भदे, राजाभाऊ पाटील, सुनील तायडे, श्रीधर काळे, प्रवीण हूड, विशाल खांजोडे,समाधान दहातोंडे,नितिन गोंडाने,भागवत खांडे, विनोद गुडदे,रामसाहेब चव्हाण, विशंभरराव निश्चित, वैकुंठराव देशमुख, अमित गावंडे,योगेश इसळ,भोलाभाऊ मदने,श्रीकांत बोंडे,बाबुभाई इनामदार, सिद्धार्थ बोबडे,विलास बोरेकर,भूषण कोकाटे,रजनीताई बेलसरे,पल्लवी वाटाणे, विनायकराव गवई,शिवाजीराव बंड, किशोर कीटूकले,नरेंद्र ठाकूर,संजय खोडस्कर, महेंद्र गैलवार, सहदेव बेलकर,राहुल येवले, अमर वानखडे, विष्णू राठोड, मनीष जगणे, सुधीर पाटेकर, मनोज गेडाम, नंदकिशोर यादव, सलाम उद्दीन शेख, विदर्भ कुमार बोबडे, रमेश काळे, मिलिंद कांबळे, प्रमोद दाळू, राजेश काळे, अब्दुल कलीम, विनायकराव ठाकरे उपस्थित होते.

कुष्ठरोग्यांच्या रूपात पाहिले बापूसाहेबांनी गाडगेबाबा

गाडगे बाबा पुण्यतिथी महोत्सवात केली कुष्ठरोगी यांची अंघोळ व वस्त्रदान

दि.१९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती– श्री संत गाडगे महाराज समाधी मंदिर गाडगेबाबा नगर अमरावती येथील गाडगेबाबा यांचा ६७ वा पुण्यतिथी महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असून १४ डिसेंबरला सुरू असलेल्या सेवा कार्याचा आज च पाचवा दिवस हा कुष्ठरोग यांना अभंग स्नान व वस्त्रदान, मिस्टन भोजनदान देऊन कुष्ठरोग यांच्या रूपात बापूसाहेब देशमुख यांनी गाडगे बाबांचे दर्शन घेतले व खऱ्या अर्थाने गाडगेबाबांची ६७ पुण्यतिथी साजरी होत असल्याचे बापूसाहेब म्हणाले सकाळी अकरा वाजता या कार्यक्रमाला सुरुवात झाली सर्वप्रथम महिलांचे स्नान व नंतर पुरुषांची अंघोळ घालण्यात आली सुगंधी उटन, साबण, तेल लावून सर्वांना ओवाळण्यात आले त्यानंतर सर्व पुरुषांना पांढरे कपडे स्त्रियांना रंगीत लुगडे ,साडी देण्यात आली त्यानंतर स्वर्गीय गोविंदराव उर्फ अण्णासाहेब देशमुख श्रुती पिक्चर श्रीमती प्रतिभाताई गोविंदराव देशमुख श्री प्रशांत गोविंदराव देशमुख दादर गोड भोजन देण्यात आले सर्वांना उलन ब्लँकेट बापूसाहेब देशमुख यांच्या उपस्थितीत वाटण्यात आले व खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी करण्यात आली त्याप्रसंगी सुमंतराव देशमुख सौ प्रीतीताई देशमुख, हर्षजित देशमुख, सौ माया ताई देशमुख, आदी मान्यवर उपस्थित होते संस्थेचे व्यवस्थापक प्रकाश महात्मे, सागर देशमुख, गजानन जवंजाळ, गजानन देशमुख, सुधीर घोंगडे, सुधाकरराव साबळे, भरत भाऊ रेडे, रघुनाथराव रोडे, अतुल रेडे, सतीश टाले, दिलीप फुके, विठ्ठलराव तेलमोरे शाम ठाकरे हरिभाऊ मोगरकर व इतर यांनी विशेष परिश्रम घेतले.

खेळातच नाही तर जीवनातही खेळ भावना महत्वाची; ज्ञानेश कुलकर्णी

राज्यस्तरीय स्पर्धेसाठी अमरावती अकोला परिमंडलातील क्रिडापटूंची निवड चाचणी

दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,– खेळामुळे दैंनदिन काम करतांनाचे तणाव कमी होऊन सांघिक भावना वाढते,जिद्द निर्माण होते, शिवाय सार्वजनिक जीवनातही खेळ भावना अत्यंत महत्वाची आहे.महावितरणच्या अमरावती आणि अकोला परिमंडलाअंतर्गत राज्यस्तरीय खेळासाठीच्या निवड चाचणी स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व क्रिडापटूंनी आपले उत्तम योगदान देण्याचे प्रतिपादन मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांनी केले.जानेवारी २०२४ मध्ये औरंगाबाद येथे होणाऱ्या महावितरणच्या राज्यस्तरीय क्रिडा स्पर्धेसाठी अमरावती आणि अकोला परिमंडलातील क्रिडापटूंची निवड चाचणी काल (दि.१७ डिसें.) हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ अमरावती येथे पार पडली. यावेळी स्पर्धेच्या उध्दाटनाप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला अकोला परिमंडळाचे मुख्य अभियंता दत्तात्रय पडळकर, एचव्हीपीएम चे प्राचार्य एस.पी.देशपांडे , अधीक्षक अभियंते दिपक देवहाते , सुनिल शिंदे,पवनकुमार कछोट, संजय खंगार,सहाय्यक महा व्यवस्थापक रूपेश देशमुख ,मनिषकुमार भोपळे, स्पर्धेचे समन्वयक म्हणून उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधुसूदन मराठे,अरूण शेलकर यांची प्रमुख उपस्थिती होती. महावितरणमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांचा सर्वांगीन विकासासोबत कर्मचाऱ्यातील कला गुणांना वाव मिळावा या उद्देशाने महावितरणकडून दरवर्षी क्रिडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असल्याचे मुख्य अभियंता दत्तात्रय पडळकर यावेळी म्हणाले ,तर १९१४ साली स्थापन झालेल्या हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ या संस्थेने पारंपारिक खेळासोबत समाजाला जोडण्याचे मोलाचे काम केले आहे.उत्तम आरोग्यासाठी आणि मनोस्वास्थ्यासाठी खेळ हा उत्तम पर्याय असल्याचे मत या संस्थेचे प्राचार्य एस.पी.देशपांडे यांनी व्यक्त केले. यावेळी स्पर्धेचे औपचारीक उध्दाटन झाल्यानंतर मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी आणि दत्तात्रय पडळकर यांनी सर्व क्रिडा प्रकाराला भेट देत स्पर्धकांना शुभेच्छा देत क्रिडापटूंचा उत्साह वाढविला. अमरावती –अकोला आंतरपरिमंडलीय क्रिडा स्पर्धेत सांघिक आणि वैयक्तिक अश्या एकुण २३ क्रिडा प्रकाराचा समावेश आहे. निवड चाचणीसाठी ३७८ स्पर्धक सहभागी झाले होते. या निवड चाचणीतून औरंगाबाद येथे होणाऱ्या महावितरणच्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी सांघिक क्रिडाप्रकारातून पुरूष गटातून ७४ आणि महिला गटातून ३६ क्रिडापटूंची राज्य स्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. वयक्तिक क्रिडाप्रकारातून पुरूष गटातून १२ ,तर महिला गटातून ११ क्रिडापटूंची निवड करण्यात आली आहे.

वइझर आश्रमात २३० अधिकाऱ्यांचा अभ्यासदौरा उद्या

दि१९विदर्भ प्रजासत्ताक अचलपूर

वइझर मॉडल काय आहे, दिव्यांग मुलांचे पुनर्वसन कसे करावे, त्यांच्या जीवनामध्ये आनंद कसा फुलवावा, सहानुभूती नको, सह्योग पाहिजे या दिव्यांगांच्या आतं हाकेला हात द्यायला वइझर येथे अभ्यास करण्याकरिता उच्चपदस्थ २३० अधिकारी २० डिसेंबर रोजी अचलपूर तालुक्यातील बइझरच्या या आश्रमात येत आहेत, राज्य शासनाने या अभ्यासाकरीता मान्यतादिली आहे. तालुक्यातील वइझर येथील

स्व. अंबादासपंत वैद्य बेवारस दिव्यांग बालगृहामध्ये सन १९९२ पासून गतीमंद, मूकबधिर, अंघ व बहुविकलांग मुलांचे पुनर्वसनाचे कार्य चालू आहे. राज्याच्या विविध जिल्ह्यामधून पोट गोळ्याला नाली, नदी, रेल्वेस्टेशन, बसस्थानक, कचरा कुंडीत टाकून दिलेल्या दिव्यांग बालकांना पोलीस बाल कल्याण समितीचा आदेश घेऊन वइझर आश्रमचे संचालक शंकरबाचा पापळकर यांच्याकडे आजीवन पुनर्वसनाकरिता स्वाधीन करतात. दिव्यांग वइझर मडिलाचे वैशिष्ट्य असे की, आतापर्यंत शंकरबाचा पापळकर यांनी ३० बेवारस दिव्यांग मुला-मुलीची लग्ने, १२ मुलांना सरकारी नोकरी लावुन दिली आहे. याशिवाय दृष्टीहीन असलेली गांधारीला संगितामध्ये लता मंगेशकर पुरस्कार मिळालेला आहे. तसेच एका दृष्टीही मुलीने एमपीएसीची परीक्षा दिली आहे. म्हणजेच वेचील या बेवारस,दिव्यांग तसेच गतीमंद मुलांचे पालन पोषणच नाही तर त्यांचे शिक्षण पूर्ण करून त्यांना सक्षम करीत त्यांच्या पायावर उभे करून देण्याची जवाबदारी शंकरबाबा पापळकर यांनी पूर्ण केली आहे. आश्रमातील या गतिमंद मुलांनी विविध जातींची १५ हजार झाडेलावून वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे या कवितेच्या ओळी सार्थ करून दाखवित जगाला निसर्गावर प्रेम करण्याचा संदेश दिला आहे. विशेष बाब म्हणजे, या आश्रमाने शासनाचे ३० लाख रुपये कर्मचारी सरकारी अनुदान परत केले. अशा या दिव्यांग बालगृहाला वइझर मॉडेल म्हणून १९१३ ला दिल्ली येथे मान्यता देण्यात आली. अशा या दिव्यांग बालगृहातील वइझर मॉडेलला समजून घेण्यासाठी दिव्यांगांचे जीवन काय असते, हे जाणून घेण्यासाठी राज्यातील आजपावेतो १२ हजार शासकीय अधिकारी भेट देऊन गेले.

अपंगांचे पुनर्वसनाकरिता हे अधिकारी वइझर मॉडेलचा अभ्यास करून शासकीय कार्यामध्ये त्याचा सदुपयोग करतील. हे बघून मला अत्यंत आनंद होत आहे.

शंकरबाबा पापळकर

त्यामध्ये जिल्हाधिकारी, फॉरेस्ट अधिकारी, एसडीओपीओ, आरटीओ, शिक्षणाधिकारी आणि सचिवालयातील ७० टक्के कर्मचारी येथे दिव्यांगांच्या संघर्षमय जीवनाचा अभ्यास करून गेले. २० डिसेंबर २०२३ ला २३० सरकारी अधिकारी वानामती नागपूर येथून मंत्रालयातील कक्ष अधिकारीबीडीओ, तहसीलदार, आरटीओ, शिक्षणाधिकारी तसेच पुणे येथील यशदा या संस्थेमधून पंचावला वर्ग १ चे अधिकारी हे वइझर मॉडेलचा अभ्यास करण्यासाठी, दिव्यांग मुलांचे पुनर्वसन कसे करावे त्यांच्या जीवनामध्ये आनंद कसा फुलावा, सहानुभूती नको, सह्योग पाहिजे या दिव्यांगांच्या आर्त हाकेला हात द्यायला बड़झर येथे शिकण्यासाठी येणार आहे. वइझर दिव्यांग बालगृहामध्ये वइझर मॉडेलचा अभ्यास करण्यासाठी उच्चपदस्थ अधिकारी येत असल्याने ही जिल्ह्याकरिता कौतुकास्पद बाब आहे.

करपा व मर रोगासह शेंगा पोखरणाऱ्या अळींचा प्रादुर्भाव

तुरीच्या उत्पादनाची शेतकऱ्यांनी सोडली आशा

दि.१९विदर्भ प्रजासत्ताक मोर्शी

गत महिन्यात सलग पाच दिवस अवकाळी पाऊस व त्यानंतर सतत ढगाळ वातावरणामुळे खरिपातील शेवटचे पीक असलेल्या तुरीला फटका बसला असून, पूर्णतः उद्ध्वस्त झाल्याचे चित्र आहे. खरिपातील अन्य पिकांप्रमाणे शेतकऱ्यांनी आता तुरीच्या उत्पादनाची आशा सोडली आहे.

तुरीचा दाणाही हाती लागणार नसल्याचे शेतकरी सांगत आहेत.तुरीची झाडे तोडण्याचा खर्चही अंगावर बसू शकतो. यंदाच्या खरीप हंगामाने शेतकऱ्यांची निराशा केली असून, त्यांना कर्जबाजारी बनविले असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. सोयाबीन, कापूस आणि तूर ही पिके विविध किडीच्या प्रादुर्भावामुळे हातची गेली आहेत. आधी सोयाबीनवर व कपाशीवर गुलाबी बोंड अळीचे आक्रमण करून शेतकऱ्यांना नाकी नऊ आणले आहे. तुरीचे पीक गेल्यात जमा आहे. उत्पादन खर्चही निघणे अशक्य आहे. तूर पीक वाढीच्या शेवटच्या टप्यात म्हणजे फुले लगडण्याच्या व शेंगा भरण्याच्या अवस्थेत आहेत. बदलत्या वातावरणामुळे व एकच एक पीक घेत असल्यामुळे व तूर पीक जैविक व अजैविक घटकाला बळी पडते. करपा रोगाची लक्षणे, मर रोगामुळे पानाच्या शिरा पिवळ्या होतात. पाने पिवळी पडतात. झाडाचे शेंडे कोमेजतात, बुरशीची वाढ झालेली दिसते. कधी कधी खोडावर पांढरी बुरशीसुद्धा आढळते.

एस.टी.बस प्रवासी स्वत:चे मोबाइल वाजवून करतात स्वत:चेच मनोरंजन

दि.१९विदर्भ प्रजासत्ताक परतवाडा

ॲण्ड्रॉईड मोबाइलच्या जमान्यात राज्य परिवहन महामंडळाच्या बसमधून (एसटी) प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे मनोरंजन व्हावे, यासाठी प्रत्येक बसमध्ये वायफाय यंत्रणा बसविण्यात आली होती. त्याचे कंत्राट एका खासगी कंपनीला देण्यात आले होते. मात्र, हा उपक्रम अल्पावधीतच अयशस्वी ठरला. सद्य:स्थितीत बसेसमधील वायफाय सुविधा बंद आहे. प्रवासी स्वतःचे मोबाइल वाजवून मनोरंजन करतात.

जिल्ह्यातील शहरी, ग्रामीण आणि दुर्गम भागातील बहुतांश प्रवासी शेकडो प्रवाशी बसमधून प्रवास करतात. परंतु, ग्रामीण भागात जाणाऱ्या एकाही बसमध्ये अग्निशमन उपकरणे व प्रथमोपचार पेट्या नाहीत. याकडे महामंडळाचेही दुर्लक्ष होत आहे. प्रथमोपचार पेट्या गहाळ झाल्यामुळे अपघात झाल्यास चालक व वाहकांनीप्रवाशांवर प्रथमोपचार कसा करावा, असा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रवाशांना प्रथमोपचार देण्यासाठी चालकाच्या केबिनमध्ये प्रथमोपचार पेटी बसविण्यात आली होती. मात्र, सद्य:स्थितीत बसमधून हे बॉक्स गायब झाले आहेत.

भंगार बस धावताहेत रस्त्यावर

अमरावती विभागांतर्गत येणाऱ्या मेळघाट, परतवाडा,दर्यापूर आगारातील अनेक बस भंगार अवस्थेत आहेत. बस चालक, वाहक आणि प्रवाशांसाठी या बस जीवघेण्या ठरत आहेत. असे असतानाही रा.प.म.कडून भंगार बस प्रवासासाठी पाठविल्या जात आहेत. विशेष म्हणजे, अनेक बसच्या सीट तुटलेल्या आहेत. पावसाळ्यात बसच्या छताला गळती लागते. भंगार बससेवेमुळे प्रवाशांना प्रचंड त्रास होत आहे.

मध्य रेल्वेला भंगार विक्रीतून २४८ कोटींची कमाई

दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती

मध्य रेल्वे मुंबई विभागाने ३० नोव्हेंबर २०२३ पर्यंत तब्बल २४८.०७ कोटी उत्पन्न भंगार विक्रीतून मिळवले आहे. कमाल ३०० कोटी ठरवलेल्या विक्री उद्दिष्टाच्या तुलनेत हे उत्पन्न तब्बल ८२.६९ टक्के इतके उल्लेखनीय असून सदर बाब १८५ कोटींच्या आनुपातिक उद्दिष्टाच्या तुलनेने ३४.०८ टक्क्यांची लक्षणीय वाढ नोंदविण्यात आली आहे. भंगार विक्रीतून मिळणाऱ्या महसुलात मुंबई मध्य रेल्वे अव्वल स्थानावर असून, नोव्हेंबर २०२३ पर्यंत मध्य रेल्वेच्या सर्व विभागात टक्केवारीत सर्वाधिक वाढ झालेली आहे. 'शून्य भंगार' उपक्रमास गती मिळाली आहे.

विशिष्ट विक्री लक्ष्यापेक्षा भंगार विक्रीत नोव्हेंबर -२०२३ पर्यंतच्या कालावधीत, तब्बल ३४.०९ टक्क्यांनी वाढ झाली आहे. भंगारातून उत्पन्न मिळवण्याच्या मध्य रेल्वेच्या दृढ प्रयत्नांना प्रभावी यश मिळाले आहे. मध्य रेल्वेच्या सर्व विभागांत भंगार विक्रीत सर्वाधिक टक्के वाढ मिळवून ते अव्वल स्थानावर आहेत. मध्य रेल्वेने वयोमर्यादा पूर्ण झालेली रेल्वे इंजिन्स, अतिरिक्त डिझेल इंजिन्स, वापरात नसलेले रेल्वे रूळ आणि वयोमर्यादा पूर्ण झालेली अपघाती इंजिन्स / रेल्वे डब्बे यासह विविध प्रकारचे भंगार वर्गीकरण आणि त्यांची विल्हेवाट लावण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. त्यामुळे त्या भंगाराचे उत्पन्नात रूपांतर झाले आहे. प्रत्येक विभाग, कार्यशाळा आणि शेड विहित वेळेत भंगार साहित्यापासून पूर्णपणे मुक्त करणे हा या उपक्रमाचा भाग आहे. १३ लोकोमोटिव्ह, २१६ डबे आणि १२४ वॅगन्स विक्रीमध्ये समावेश आहे.

चालू आर्थिक वर्षात आतापर्यंत मिळालेले उत्पन्न :

भुसावळ विभाग: ४९.२० कोटी, माटुंगा आगार: ४०.५८ कोटी, मुंबई विभाग: ३६.३९ कोटी, भुसावळच्या इलेक्ट्रिक लोको शेड: २३.६७ कोटी, नागपूर विभाग: २२.३२ कोटी, पुणे विभाग: २२.३१ कोटी, सोलापूर विभाग : २०.७० कोटी, तसेच परळ, हाजी बंदर-शिवडी, मनमाड व करी रोड एकत्रितपणे ३२.९० कोटी.

अनिमेशन कॉलेज येथे डॉक्टरेट पुरस्कार वितरण सोहळा थाटात

लाईफ डेव्हलपमेंट सोसायटीचे सचिव नरेंद्र माणिक गुलदेवकर यांना मानद डॉक्टरेट पदवी बहाल

दि.१९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती

हार्वे मिशन इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी टेक्सास अमेरिका इंटरनॅशनल ओपन युनिव्हर्सिटी व्हेनेझूएला , थिओफनी इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी फिलिपिन यांच्या संयुक्त विद्यमाने डॉक्टरेट पदवी पुरस्कार वितरण समारंभ द कॉलेज ऑफ अनिमेशन मार्डी रोड अमरावती येथे मोठ्या थाटात पार पडला . कॉलेज चे संचालक विजय राऊत कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा , डॉ . अब्दुल अकील , तसेच युगांडाचे कुलपती , हार्वेचे कुलगुरू , नांदेडचे सिव्हिल सर्जन डॉ . मोहम्मद जिलानी , माजी उच्च शिक्षण सह संचालक डॉ . बीजी खोब्रागडे आदी मान्यवर उपस्थित होते , या दिमाखदार सोहळ्यात लाईफ डेव्हलपमेंट सोसायटीचे सचिव नरेंद्र माणिक गुलदेवकर , रौनक जमाल , तुषार घावट , निलेश सोमाणी , इम्तियाज गोरखपुरी आदींना मानद डॉक्टरेट पदवी बहाल करण्यात आली . यावेळी शिक्षण तज्ज्ञांनी आपले मत व्यक्त करतांना आधुनिक शिक्षण व त्यातून निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधी यावर मार्गदर्शन केले . प्रगती साधायची असले तर उच्च शिक्षणाची कास धारावी , नवे संशोधन व प्रगत तंत्रज्ञान हेच विकासाचे नवे स्वरूप असल्याचे मनोगत मान्यवरांनी व्यक्त केले. या दिमाखदार सोहळ्याच्या आयोजनासाठी लाईफ डेव्हलपमेंट सोसायटीचे सचिव नरेंद्र माणिक गुलदेवकर यांनी परिश्रम घेतले.निलेश गायकवाड, जगदीश गुप्ता, धम्मरक्षित वानखडे, अजय इंदुरकर इत्यादींनी स्वागत केले तर कार्यक्रमाचेप्रा. वृंदा मुक्तेवार यांनी संचालन केले व निलेश गायकवाड यांनी आभार प्रदर्शन केले.

इंटॅक अमरावती तर्फे गाविलगड शौर्य दिवस कार्यक्रम संपन्न

दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती

गाविलगड किल्ल्याच्या इतिहासातील एक महत्वपूर्ण घटना म्हणजे इ.स.१८०३ चे ब्रिटिश - मराठा युद्ध. यामध्ये १५ डिसेंबरला झालेल्या निकराच्या लढाईत किल्लेदार बेनिसिंग सोबत अनेक मराठी विर धारातिर्थी पडले. यावेळी बेनिसिंगाच्या पत्नी सह एकुण १४ स्त्रियांनी जोहार केला होता. या वीरांच्या स्मृतिंना उजाळा देण्यासाठी गाविलगड किल्ल्यावर दरवर्षी शौर्य स्मृतिदिन पदभ्रमण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते. यावर्षी दि. १७ डिसेंबर (रविवार) रोजी इंटॅक, अमरावती तर्फे गाविलगड भ्रमण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात चिखलदरा कडील मछली दरवाजा कडून झाली. इंटॅक, अमरावतीचे सदस्य श्री.किरण मोरे यांनी सर्वप्रथम सर्व सहभागींचे स्वागत करुन कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे विभागीय वनाधिकारी श्री. यशवंत बहाळे यांची उपस्थिती होती. संपूर्ण किल्ला भ्रमण कार्यक्रमात, किल्ले अभ्यासक तथा इंटॅक, अमरावतीचे संयोजक डॉ जयंत वडतकर यांनी किल्याचा इतिहास, ऐतिहासिक वास्तू आणि १८०३ च्या ब्रिटिश -मराठा लढाईची संपूर्ण वृत्तांत विषद केला. किल्ल्यातील दिल्ली दरवाजा व देव तलावाच्या जवळ असलेल्या विरांच्या समाधी स्थळी वीरांच्या आणि विरांगणांच्या समाधीवर वंदन करण्यात आले.या कार्यक्रमात मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे विभागीय वनाधिकारी श्री यशवंत बहाळे यांचेसह मेळघाट वन्यजीव विभागाचे कर्मचारी व मार्गदर्शक, अहमदनगर येथील श्री. सुधीर सरोदे, अचलपूर येथील डॉ. रणजित चित्रकार, प्रशांत व नमिता किरणापूरे यांचेसह एकुन ३० वारसा प्रेमींची उपस्थिती होती.

कापसाच्या दरात मोठी घसरण झाल्याने शेतकरी मोठ्या संकटात

अवकाळी पावसाने शेतक-यांच्या अपेक्षाचे पाणी : खर्च जास्त झाल्याने लागवडीचा खर्च निघेणा

दि.१९ विदर्भ प्रजासत्ताक चांदुर बाजार

अमरावती जिल्ह्यातील चांदुर बाजार तालुक्यातील कापसाचा दर कमी असल्याने शेतकरी मोठा हवालदिल झाला आहे लाखो रुपये खर्च करून कापसाचे उत्पादन कमी व त्यात भाव नसल्याने संकटात सापडला आहे बँकांचे कर्जाचे डोगर असा मोठा प्रश्न चांदुर बाजार तालुक्यातील शेतकऱ्यांना पडला आहे चांदुर बाजार तालुक्यामध्ये यंदा कापसाच्या उत्पादनात घट आलेली आहे. दर वाढतील या अपेक्षेने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र अवकाळी पाऊसानंतर कापसाच्या दरात मोठी घसरण झाली आहे दर सहा हजार नऊशे रुपयांवर आले आहेत.त्यामूळे शेतक-यांच्या अपेक्षांवर पाणी पडले आहे.यंदा सुरुवातीपासून कापसाला चांगले दर मिळतील, अशी अपेक्षा तालुक्यातील शेतकऱ्यांना होती. मात्र, शेतकऱ्यांच्या पदरी पुन्हा निराशाच पडली आहे. गेल्या वर्षी कापसाला चांगले दर मिळाले होते. अखेरच्या टप्प्यात दरवाढ झाल्याने शेतकऱ्यांपेक्षा व्यापाऱ्यांनाच त्याचा फायदा झाला होता यंदा हंगामाच्या सुरुवातीपासून कापसाला चांगले दर मिळण्याचा अंदाज तज्ज्ञांचा होता. तो खरा होताना दिसत असतानाच वादळी पावसाने शेतकऱ्यांचा घात केला आहे हंगामाच्या सुरुवातीपासूनच कापसाला हमीभावापेक्षा जास्त दर मिळत होता.कापसाचे पीक चांगले दिसतानाही उत्पादन कमी आल्याने शेतकरी मेटाकुटीस आले होता कपाशीला अतिवृष्टीचा मोठा फटका बसला असून पिकांची वाढ खुंटल्याने त्याचा परिणाम उत्पादनावर झाला आहे. राहिलेली कसर वादळी पावसाने भरून काढली. त्यामुळे उत्पादनात मोठी घसरण झाली आहे गेल्या वर्षी शेवटच्या टप्प्यात कापसाला १२ हजार रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला होता.यंदा खासगी बाजाराचा प्रारंभ झाला, तेव्हा सात हजार सहाशे रुपये दर देण्यात आला. त्यामुळे या दरात आणखी वाढ होण्याची शक्यता होती. मात्र, दरवाढीची शक्यता आता धूळीस झाली आहे. कापसाच्या दरात घसरण झाली असून, दर सहा हजार पाचशे रुपयांवर स्थिरावले आहेत. एका मागून एक संकट येत असल्याने यंदाचा हंगामही शेतकऱ्यांच्या हातून गेल्यातच जमा आहे.या वर लवकर लवकर शासनाने दखल घेऊन मालाला भाव व शेतकर्यांचे कर्ज माफ करून मदत करण्यात यावी नाही तर चांदुर बाजार तालुक्यातील माधान, शिरजगाव, वणी, घाटलाडकी, देउरवाड़ा, फुबगाव, शिरजगाव अर्डक, जवळा,राजुरा व तालुक्यातील सर्व गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मोठे आंदोलन करू असा ईशारा दिला आहे.


अज्ञान, अंधश्रध्दा आणि अस्वच्छता
याबद्दल जागरूकता निर्माण करणारे
स्वच्छतेविषयीची प्रत्येक कृती,
देई आरोग्यास गती
संत गाडगेबाबा
यांच्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन !!
२० डिसेंबर
डॉ. धनराज चक्रे
अध्यक्ष भाजपा अनु. जाती मोर्चा
अमरावती शहर जिल्हा
प्रभाग क्र. 1 शेगाव रहाटगाव

अयोध्येचे स्वामी सत्येंद्र व हनुमान गढीचे महंत राजूदास महाराज कथा स्थळी

दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती

श्री राम जन्मभूमी अयोध्या येथील बाबरी पतन ते भव्य दिव्य प्रभू श्रीराम मंदिर निर्माण या सर्व घडामोडींचे गेल्या ३५ वर्षापासून अग्रणी शिलेदार असलेले स्वामी सत्येंद्रजी तसेच हनुमान गढी अयोध्याचे मुख्य महंत राजू दास महाराज हे आज मंगळवारी अमरावतीत आले असून ते श्री हनुमान गढी अमरावती येथे हनुमान चालीसा ट्रस्टच्या वतीने आयोजित शिवमहापुराण कथेला उपस्थित होते.

श्रीराम जन्मभूमी अयोध्या येथे प्रभू श्री राम लल्ला चे भव्य दिव्य मंदिर व्हावे यासाठी सदा अग्रसर असणारे स्वामी सत्येंद्रजी हे कट्टर हिंदुत्ववादी असून गेल्या ३५ वर्षा पासून यासाठी कठीण संघर्ष त्यांनी केला आहे. बाबरी पतन,एका छोट्या तबुंत असलेली प्रभू श्री रामाची मूर्ती ते दिनांक २२ जानेवारी २०२४ रोजी होणाऱ्या भव्य दिव्य राम मंदिराचे उद्घाटन यासाठी जे मोजके शिलेदार आहेत त्यापैकी एक स्वामी सत्येंद्रजी आहेत. तसेच महंत राजुदास महाराज हे हनुमान गढी अयोध्या चे मुख्य महंत असून त्यांनीच हनुमान गढी अमरावती येथे स्थापित होणाऱ्या १११ फूट उंच हनुमान मूर्ती स्थापनेसाठी श्री राम जन्मभूमी तसेच हनुमान गढी अयोध्या येथील पवित्र मातीचे कलश आमदार रवी राणा यांना सुपूर्द केले होते. मंगळवारी अमरावतीच्या हनुमान गढी येथे सुरु पंडित प्रदीप मिश्रा यांच्या महापुरान कथेदरम्यान स्वामी सत्येंद्र व महंत राजूदास महाराज यांच्या दर्शनाचा लाभ लाखो भक्तांनी आज घेतला.तत्पूर्वीपूज्य पंडित प्रदीप जी मिश्रा महाराज यांनी श्री तपोनेश्वर व श्री कोंडेश्वर संस्थान या ठिकाणी जावून शिवपिंड चे दर्शन घेतले..

उद्याला शिवमहापुराण कथेचा शेवटचा दिवस
कथेचा वेळ राहणार सकाळी ८ ते ११

हनुमान चालिसा चॅरीटेबल ट्रस्टतर्फे हनुमानगढी येथे आयोजित पूज्य पंडित प्रदीप जी मिश्रा यांच्या पाच दिवसीय शिवमहापुराण कथेला सुरुवात झाली आहे. कथेचा आजचा चौथा दिवस होता. महाराष्ट्र राज्यासह सह इतर राज्यातील लाखो भाविक शिव कथेचा आनंद घेत आहे. आजच्या कथेला प्रभू श्रीराम मंदिर निर्माण या सर्व घडामोडींचे गेल्या ३५ वर्षापासून अग्रणी शिलेदार असलेले स्वामी सत्येंद्रजी तसेच हनुमान गढी अयोध्याचे मुख्य महंत राजू दास महाराज उपस्थित होते. तर रोज प्रमाणे आजही राणा दाम्पत्याने या कथेचा लाभ घेतला आयोजकांच्या वतीने अतिशय उत्कृष्ट व्यवस्था या ठिकाणी करण्यात आली आहे. तर पोलिसांचा तगड़ा बंदोबस्त या ठिकाणी आहे.

नव्याने सामाजिक बांधणी ही नवीन युगाची गरज : नरेंद्र बोल्डे

दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती

नव्याने सामाजिक बांधणी ही नवीन युगाची गरज आहे. नवीन युग हे आर्टिफिशियल इंटेलिजन्स चे आहे. त्यामुळे शैक्षणिक, आर्थिक तसेच वयोगटावर आधारित नव्याने सामाजिक संरचना करून भारताला क्रमांक एक ची आर्थिक महासत्ता बनविणे म्हणजे खऱ्या अर्थाने जागतिक अल्पसंख्यांक हक्क दिन साजरा करणे होय, असे प्रतिपादन सहायक लेखाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,अमरावती, येथील नरेंद्र गोल्डे यांनी केले. नूतन विदर्भ शिक्षण मंडळ संचालित महिला महाविद्यालय, जोग चौक येथे आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अल्पसंख्यांकांच्या भवितव्यासाठी संविधानात असलेल्या कलमाचा त्यांनी उदापोह केला.कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलताना प्रा. जयंत पराते म्हणाले की, पर्शिया मध्ये हजारभर लोकांनी घुसखोरी केली आणि स्थानिक लोक उपरे झाले. अल्पसंख्यांक हक्क हा कायदेशीर आहे. याचा अर्थच असा आहे की सर्वांनी एकजुटीने शांततेने राहावे. बंधुभाव जपावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. ते पुढे म्हणाले की, ही भगवान बुद्धाची पवित्र भूमी आहे. तथागतांनी जो विचार दिला तो या भूमीत रुजवायची आवश्यकता आहे. तथागत म्हणतात की, मनुष्याने जर वाईट विचार केले तर त्याला कष्ट प्राप्त होतील. शुद्ध विचार असतील तर जीवनामध्ये सौख्य प्राप्त होईल. दुष्ट प्रवृत्तीला नाश करायचा असेल तर सद्प्रवृत्ती धारण करावी लागेल. कारण दुष्टतेला दुष्टता संपवू शकत नाही. राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोगाबद्दल त्यांनी सविस्तर माहिती दिली. व्यासपीठावर उपस्थित वक्ते शेरेकर, सहाय्यक लेखाधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती म्हणाले की, ही संत गाडगेबाबा, वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या चरणस्पर्शाने पवित्र झालेली भूमी आहे. यावर आनंद व शांतीच उगवणार आहे. ते पुढे म्हणाले की, अरण्यात भगवान राम एका ठिकाणी गेल्यानंतर त्यांचे बंधू लक्ष्मण यांच्या मनात विद्रोही विचार आले पण तो परिसर पार केल्यानंतर ते विचार निघून गेले. आपणाला अशी भूमी बनवायची आहे की, जेथे मनात आनंद, सौख्य, शांतीचे विचार राहतील. जागतिक अल्पसंख्यांक हक्क दिन ही यासाठीची नांदी आहे. व्यासपीठावर उपस्थित मराठी विभागाचे उमेश बेलोरे यांनी याप्रसंगी आपले विचार व्यक्त केले.कार्यक्रमाची सुरुवात स्वरस्वती वंदनाने झाली. श्रावणी निचत, खूशी गवई, साक्षी कोकणे यांनी अत्यंत सुंदर पद्धतीने स्वागत गीत सादर केले. कार्यक्रमाचे संचालन श्रावणी निचत हिने बहारदारपणे केले. मान्यवरांचा परिचय प्रा. स्नेहल राठोड यांनी करून दिला. याप्रसंगी बी.ए. भाग एकच्या विद्यार्थीनींनी उपस्थित सर्व प्राध्यापकांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा वर्डिकर, प्रा यावलीकर, प्रा स्नेहल राठोड,हेमंत पांडे, निरंजन मेश्राम,प्रा. गुल्हाने, प्रा. तायडे, प्रा. सावळे, अमोल बिंड यांनी परिश्रम घेतले.

दि.२२ डिसेंबर ला धारणी येथे भारतीय संविधान न बदलविता, संपुष्टात येत आहे का?अॅड.दिलीप एडतकर यांचे व्याख्यान

वर्ग १० वीच्या विद्यार्थीनींना संविधान प्रतींचे वितरण

दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती

संविधान बचाओ अभियाना अंतर्गत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमेटी व्दारा, शुक्रवार दि.२२ डिसेंबर २०२३ रोजी दुपारी १२ वाजता, ज्ञानदीप माध्यमिक कन्या विद्यालय धारणी येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर निर्मित भारतीय संविधान न बदलविता संपुष्टात येत आहे का? या विषयावर शाहु फुले आंबेडकरी विचारवंत, दैनिक विदर्भ मतदार वर्तमान पत्राचे मुख्य संपादक तथा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेश प्रवक्ते अॅड.दिलीप एडतकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले असून याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस किशोर बोरकर यांचेकडून वर्ग १०,वीच्या विद्यार्थ्यांनींना मान्यवरांचे हस्ते संविधानाच्या प्रतींचे वितरण करण्यात येणार आहे.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्व.दयाराम पटेल स्मारक ट्रस्ट धारणीचे संस्थापक अध्यक्ष नानासाहेब भिसे राहणार असुन याप्रसंगी, जन्म शताब्दी वर्षानिमित्त नानासाहेब भिसे यांचा संविधान बचाओ अभियानाचे आयोजक, किशोर बोरकर यांच्याकडुन भावपूर्ण सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ गणेश पाटील, आमदार राजकुमार पटेल,माजी आमदार केवलराम काळे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस किशोर बोरकर, आय,एम, आयचे माजी अध्यक्ष, डॉ.बी.आर. देशमुख, स्व.दयाराम पटेल स्मारक ट्रस्ट धारणीच्या अध्यक्षा, सौ. मिनाताई मालवीय, सचिव रमेश जिराफे, उपाध्यक्ष अनंत भिसे, कोषाध्यक्ष,प्रदिप भिसे, धारणी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्रसिगं गहरवार, वसंतराव नाईक महाविद्यालय धारणीचे प्राचार्य, विजयकुमार गवई, ज्ञानदीप माध्यमिक कन्या विद्यालयाचे मुख्याध्यापक, नारायण मालवीय अमरावती शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस प्रा.अनिल देशमुख व राजाभाऊ चौधरी,आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

शेतकरीविरोधी सरकारचा धिक्कार असो, विरोधी पक्षाचे आमदार आक्रमक

दि.१९विदर्भ प्रजासत्ताक नागपूर

अवकाळी पाऊस, गारपीट यामुळे राज्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्यांना नुकसानभरपाई म्हणून देण्यात आलेली रक्कम ही अक्षरश: तोंडाला पाने पुसण्याचा प्रकार आहे, अशी टीका करत महाविकास आघाडीच्या आमदारांनी मंगळवारी विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन केले. आंदोलनादरम्यान विरोधकांनी शेतकरीविरोधी सरकारचा धिक्कार असो, आणि कायदा सुव्यवस्थेवर घोषणा दिल्या. राज्यातील शेतकऱ्यांवर ओढवलेल्या आसमानी संकटावर सभागृहात चर्चा झाली. त्यावर सोमवारी सभागृहात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उत्तर देत शेतकऱ्यांना नुकसानभरपाई जाहीर केली. मात्र, ही नुकसानभरपाई पुरेशी नसल्याची टीका करत विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला. 'महाराष्ट्र शिव- शाहू- फुले- आंबेडकरांचा की दहशतखोरांचा', 'इक्बाल मिर्चीसोबत कुणाचे व्यवहार', कोणता मंत्री ड्रग्ज माफियाचा साथीदार', 'महिला असुरक्षित तरुण बेरोजगार, झोपा काढतंय हे ट्रिपल इंजिन सरकार' असे फलक हातात घेऊन विरोधकांनी आंदोलन केले.

अमरावती मध्यवर्ती बसस्थानकाच्या पुनर्बांधणी व विस्तारीकरणाचा प्रस्ताव कधी मान्य करणार? : आ.सुलभा खोडके

दि.१९विदर्भ प्रजासत्ताक नागपूर

अमरावती मध्ये सर्व प्रकारच्या पायाभूत सेवा सुविधांची पूर्तता तसेच आरोग्य , शिक्षण, क्रीडा व रस्ते विकास आदींबाबत चांगल्या दर्जेदार व गुणवत्तापूर्वक सुविधा निर्माण होत असतांना प्रवासी वाहतूक सेवा सुद्धा सुरक्षित व बळकट होणे जरुरीचे आहे . त्याअनुषंगाने अमरावती मध्यवर्ती बस स्थानक व आगाराच्या जुन्या इमारतीची पुर्नबांधणी व विस्तारीकरणाबाबत आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या कामकाजादरम्यान लक्षवेधी सूचना मांडली. या संदर्भात शासनाला दिलेला प्रस्ताव कधी व किती दिवसात मान्य करणार असा प्रश्न उपस्थित करून आमदार महोदयांनी सभागृह दणाणून सोडले .

मागील ७० वर्षांपासून प्रवाश्यांचा डोलारा सांभाळणाऱ्या अमरावती मध्यवर्ती बस स्थानक व एस.टी.आगाराला सद्या घर -घर लागली आहे. इमारत जुनी झाली असून क्षतीग्रस्त होण्याच्या मार्गांवर आहे. त्याठिकाणी स्वच्छता नसून प्रसाधन गृह व अन्य सुविधांची सुद्धा व्यवस्था ही जुनीच असून मोडकळीस आली आहे. पावसाच्या दिवसात बसस्थानकाला गळती लागत असून विद्यार्थी , महिला व प्रवाश्यांना गैरसोय सहन करावी लागते आहे.

त्याअनुषंगाने अमरावती मध्यवर्ती बसस्थानक व आगाराची पुर्नबांधणी तसेच तेथे सुरक्षित प्रवासीसेवा व चालक- वाहक व कर्मचाऱ्यांच्या सोयीच्या दृष्टीने आवश्यक पायाभूत सुविधांची उपलब्धता आदी बाबींना घेऊन अमरावतीच्या आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी गेल्या २६ सप्टेंबर २०२३ रोजी पाहणी केली होती. सद्यस्थितीत अमरावती एस.टी. आगार व बसस्थानक हे जवळपास साडेतीन एकर जागेत आहे. त्यामुळे तेथील गॅरेज (वर्कशॉप) व मध्यवर्ती बसस्थानक असे दोन भाग मिळून एक सुसज्य व प्रशस्त नवीन बसस्थानकाची पुर्नबांधणी व विस्तार करणे हे प्रवाशांच्या सुरक्षिततेला व सुविधेला घेऊन आवश्यक असल्याचे पाहणीदरम्यान निदर्शनास आल्याने या बाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता . तसेच अमरावती मध्ये तपोवन- विद्यापीठ भागात एक गॅरेज (वर्कशॉप) आहे.त्याठिकाणी एसटी बस चे गॅरेज कायम ठेवून तेथूनच दुरुस्तीचे कामे सुरळीत ठेवण्याबाबत सुद्धा प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे . या बाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला असतांना सुद्धा अद्यापही मान्य करण्यात न आल्याने आ. सौ . सुलभाताई खोडके सभागृहात चांगल्याच आक्रमक झाल्या. तसेच याबाबतचा दिलेला प्रस्ताव कधी मान्य करणार असा प्रश्न आमदार महोदयांनी उपस्थित करून परिवहन मंत्री दादाजी भुसे यांचे लक्ष वेधले .

उद्या पासून दत्त जयंती व अखंड नामजप सप्ताह
श्री स्वामी समर्थ व आध्यात्मिक केंद्रात होणार धार्मिक कार्यक्रम

दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती



रहाटगाव येथील श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक केंद्रात २० डिसेंबर ते २७ डिसेंबर पासून श्री दत्त जयंती व अखंड नामजप सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.सप्ताहात २० डिसेंबर रोजी ग्रामदेवता निमंत्रण,मंडळ मांडणी, गुरू चरित्र ग्रंथ मांडणी,२१ रोजी सप्ताह प्रारंभ, अग्निस्थापना ,स्थापित देवता हवन, २२ रोजी नित्य स्वाहाकार,गणेश याग व श्री मनोबोध याग, २३ रोजी गिताईयाग वरूथिनी एकादशी निमित्ताने श्री चैतन्य गोरक्षाय नम: मंत्राचे विशेष हवन होईल ,२४ रोजी नित्य स्वाहाकार, श्री रूद्रयाग, २५ रोजी नित्य स्वाहाकार, श्री स्वामी याग, २६ नित्य स्वाहाकार, चंडियाग, २७ रोजी नित्य स्वाहाकार, श्री दत्त जन्म यानंतर नैवेद्य व आरती होवून श्री सत्यदत्त पूजन, बली पुर्णाहुती, भगवतीला अलंकार अर्पण होईल, पुरणाच्या दिव्याची महाआरती होवून काला होईल तरी या सप्ताहाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजक मंडळींनी केली आहे.